- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४२,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३१,३५० /-
✔ चांदी : १,९९,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : बुधवार, २८ ऑक्टोबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३१८ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

थोडक्यात

अन्नधान्याचे दर कडाडणार

नवी दिल्ली : एल निनोमुळे हवामानात होणारे प्रतिकूल बदल, खते आणि शेतीचा वाढता खर्च यामुळे २०२७ मध्ये जागतिक अन्नधान्याच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. याचे परिणाम येत्या काही महिन्यांत अधिक स्पष्टपणे दिसून येतील, मात्र अन्नधान्यावरील पूर्ण परिणाम जाणवण्यासाठी काही काळ लागेल, असा निष्कर्ष एस अँड पी ग्लोबल या आंतरराष्ट्रीय संस्थेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टमध्ये नोंदवण्यात आला आहे.

अत्यंत तीव्र एल निनोमुळे प्रमुख पीक उत्पादक क्षेत्रांतील कृषी उत्पादनांवर संकट येऊ शकते, असा इशाराही या रिपोर्टमध्ये देण्यात आला आहे. अतिशय तीव्र स्वरूपाचा एल निनो २०२६ च्या अखेरच्या टप्प्यात सर्वोच्च पातळीवर असेल. यामुळे २०२७ मध्ये आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील प्रमुख शेतीप्रधान देशांमध्ये भीषण दुष्काळ किंवा अतिवृष्टीसारख्या संकटांची मालिका सुरू होऊ शकते. आधीच खतांच्या तुटवड्यामुळे ज्या भागातील जमिनीची उत्पादकता घटली आहे, तिथे या बदलांचा सर्वाधिक फटका बसेल, असा इशाराही रिपोर्टमध्ये देण्यात आला आहे. रशिया-युक्रेन युद्धामुळे जगभरातील अन्नधान्याचा राखीव साठा ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. अशा परिस्थितीत एकाच वेळी अनेक देशांमध्ये पिकांचे नुकसान झाले, तर अन्नधान्याचा साठ्याबाबत गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा इशारा देताना एल निनोमुळे जागतिक अन्नसंकट अगदी अटळ आहे असे नाही; पण ते आता केवळ दूरवरचा धोका उरलेला नसून अगदी तोंडावर येऊन ठेपले असल्याचेही एस अँड पी ग्लोबलचा रिपोर्ट स्पष्ट करतो.

मविआ आणि महायुतीत चुरसीची लढत

३ जागी महाविकास आघाडी तर २ जागी महायुतीची आघाडीवर





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक अशा पाच मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान पार पडले होते. आज या निवडणुकीचा निकाल लागत असून एकूण १८२ उमेदवार रिंगणात आहेत. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात शुक्रवारी ६२.७८ टक्के मतदान आणि शिक्षक मतदारसंघात उच्चांकी ८५.८७ टक्के मतदान झाले. पुणे, नागपूर आणि औरंगाबाद पदवीधर तर पुणे व अमरावती शिक्षक अशा पाच मतदारसंघांत कोण बाजी मारणार? याकडे लक्ष असेल.

महाराष्ट्रात पाच तर देशभरातील चार राज्यात एकूण २८ विधानपरिषदेच्या जागांवर आज मतमोजणी होत आहे. एनडीएला या निवडणुकीत कशाप्रकारे पाठिंबा मिळेल, याकडे लक्ष लागले आहे.

पुणे पदवीधर मतदारसंघांत सर्वाधिक मतदार तसेच सर्वाधिक ४७ उमेदवार रिंगणात आहेत. औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात ४१, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ३८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून २६ आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. एकूण १८२ उमेदवारांचे भवितव्य या निवडणुकीत ठरणार आहे.

विधान परिषदेच्या या दोन्ही निवडणुका भाजप आणि विरोधकांनी प्रतिष्ठेच्या केल्या होत्या. पुण्यात पदवीधरसाठी भाजपकडून डॉ. स्मिता जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसकडून (शरद पवार) हर्षदा देशमुख-जाधव, तर शिवसेनेकडून बंडखोरी करून सुनील मोदी निवडणुकीच्या रिंगणात होते. शिक्षक मतदारसंघात भाजपकडून कौस्तुभ गावडे यांच्यापुढे काँग्रेसचे विद्यमान आमदार जयंत आसगावकर यांचे आव्हान असले, तरी अपक्ष उमेदवार सचिन सानप यांना शिवसेनेने (शिंदे) पाठिंबा दिल्यामुळे आणि माजी आमादार दत्ता सावंतही निवडणुकीच्या रिंगणात असल्यामुळे चुरस वाढली होती.

मतदार नोंदणीपासून प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यापर्यंत राजकीय पक्षांनी यंत्रणा सक्रिय ठेवली होती.नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या मतमोजणीदरम्यान प्रवेशाच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे मुन्ना यादव आणि भाजप पदाधिकारी रितेश गावंडे यांची पोलिसांशी खडाजंगी झाल्याने मतमोजणी केंद्राबाहेर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. मतमोजणी केंद्रात प्रवेशासाठी पास आवश्यक असल्याची पोलिसांची भूमिका आणि पास मिळवून देण्याबाबत गावंडे यांनी केलेले वक्तव्य, यामुळे वादाला तोंड फुटल्याची माहिती आहे.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या मतमोजणीदरम्यान पहिल्या फेरीत काँग्रेसचे उमेदवार अभिजीत वंजारी आघाडीवर असल्याचे स्पष्ट होताच मतमोजणी केंद्राबाहेर काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यकर्त्यांनी 'व्होट चोर, गद्दी छोड' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. या घोषणांमुळे केंद्राबाहेर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

नितेश कराळे यांचा दणका

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नागपूरमध्ये ६० टक्के मतदान झाले होते. तर चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली भागात या निवडणुकीसाठी ७१ टक्क्यापेक्षा जास्त मतदान झाले होते. या निवडणुकीत संपूर्ण भाजप पक्ष एकदिलाने मैदानात उतरला होता. अखेरच्या टप्प्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे हे तिघेही प्रचारासाठी आले होते. याचा प्रभाव निश्चितच मतदारांवर झाल्याचे सांगितले जात होते. त्यामुळे काल सकाळी मतमोजणीला सुरुवात झाली तेव्हा भाजपच्या सुधाकर कोहळे यांना आपल्या विजयाचा पूर्ण विश्वास होता. आपण पहिल्याच फेरीत विजयी होऊ, असे त्यांना वाटत होते. मात्र, रात्रीपर्यंत हे चित्र बदलत गेले आणि दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

भाजपच्या प्राथमिक सर्व्हेत नितेश कराळे यांना पहिल्या पसंतीची १५००० मतं मिळू शकतात, असा अंदाज वर्तविण्यात आला होता. मात्र, नितेश कराळे यांनी या निवडणुकीत त्यापेक्षाही सरस कामगिरी केली आहे. नितेश कराळे यांना पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये तब्बल २५ हजार मतं मिळाली आहेत. भाजपच्या सर्व्हेनुसार नितेश कराळे यांना पहिल्या पसंतीची १५००० मतं मिळाली तर हेच मतदार दुसऱ्या पसंतीची मतं कोणाला देणार, यावर नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचा निकाल ठरेल, अशी चर्चा कालपासून सुरु होती. ही चर्चा आता खरी ठरताना दिसत आहे. दुसऱ्या पसंतीच्या मतांसाठी कोणाला अधिक पसंती आहे, याचा कोणत्याही राजकीय पक्षाला नेमका अंदाज नाही. आज दुपारपर्यंत संपूर्ण निकालाचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

लाचलुचपत जनजागृती सप्ताहातच कृषी सहाय्यक ४० हजारांची लाच घेताना जाळ्यात

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे

भ्रष्टाचाराविरोधात जनजागृती सप्ताह सुरू असतानाच कोरपणा येथील कृषी सहाय्यकाला ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) वर्धा पथकाने रंगेहात पकडले. बंधाऱ्याच्या कामाचे प्रलंबित बिल मंजूर करून देण्यासाठी उदगीरे याने सुरुवातीला ५५ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. तडजोडीनंतर ४० हजार रुपये स्वीकारून उर्वरित रक्कम नंतर घेण्याचे त्याने मान्य केले होते.

तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार २७ ऑक्टोबर रोजी शासकीय पंचांसमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. त्यात लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून ५०० रुपयांच्या ८० नोटा, अशा एकूण ४० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताच पथकाने सायंकाळी ५.५५ वाजता उदगीरे याला रंगेहात ताब्यात घेतले.

आरोपीच्या अंगझडतीत विवो कंपनीचा मोबाईल आणि ५९५ रुपये रोख आढळून आले. त्याच्या घराची झडती घेण्याची प्रक्रिया सुरू असून, गडचांदूर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील पोलीस निरीक्षक केदार करीत आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप मुपडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार मंगेश झामरे, सचिन गाडवे आणि पोलीस शिपाई प्रीतम इंगळे, लक्ष्मण केंद्रे व विष्णू काळुसे यांच्या पथकाने केली.

भ्रष्टाचाराविरोधात नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी जनजागृती सप्ताह सुरू असतानाच लाचेची ही घटना उघडकीस आल्याने चर्चेला उधाण आले आहे. कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने शासकीय कामासाठी लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी तातडीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पोलिसांनी उधळला नक्षल्यांचा डाव, मोठा शस्त्रसाठा जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली

सुरक्षा दलांना धोका पोहोचवण्याच्या व घातपात घडवण्याच्या उद्देशाने माओवाद्यांनी जंगलात लपवून ठेवलेला मोठा शस्त्रसाठा जिल्हा पोलिस दलाने मंगळवारी, २७ ऑक्टोबर रोजी उद्धवस्त केला. एटापल्ली तालुक्याच्या वांगेतुरी ठाण्यांतर्गत येणाऱ्या छत्तीसगड सीमेवरील माचुवंचा जंगलात ही कारवाई करण्यात आली असून ५ अग्निशस्त्रांसह मोठ्या प्रमाणावर स्फोटक साहित्य जप्त करण्यात आले.

पोलिसांच्या माहितीनुसार, आंतरराज्यीय सीमावर्ती भागातील दुर्गम जंगल परिसराचा गैरफायदा घेऊन माओवाद्यांकडून शस्त्रास्त्रे व स्फोटके जमिनीमध्ये गोपनियरित्या लपवून ठेवली जात असत. नक्षल सप्ताह किंवा निवडणुकांसारख्या प्रसंगी सुरक्षा दलांवर घातपात करण्यासाठी या साहित्याचा वापर केला जाण्याचा प्लॅन होता. यासंदर्भात मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे, २७ ऑक्टोबर रोजी पहाटे पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष अभियान पथकाच्या ४ तुकड्या व बॉम्ब शोधक व नाशक (बीडीडीएस)चे पथक शोध मोहिमेसाठी रवाना करण्यात आले होते. मोहिमेदरम्यान जवानांनी परिसराची कसून तपासणी केली असता माओवाद्यांनी जमिनीखाली गाडून ठेवलेला साठा हाती लागला. यामध्ये १२ नग क्लेमोर, १ १२-बोअर रायफल, ३ सिंगल शॉट रायफल्स, १ एअर गन, १ बॉटल स्फोटक, १ जिवंत क्लेमोर स्फोटक, १ वायरलेस माईक सेट, १ हत्याराचा लोअर हँडगार्ड, १०० सुतळी बॉम्ब आणि ५ जोडी माओवादी गणवेशाचे हिरव्या रंगाचे कापड जप्त करण्यात आले.

मृत्यूच्या दाढेतून रानगव्यांना जीवनदान! लोको पायलटच्या संवेदनशीलतेने वाचले मुक्या जीवांचे प्राण

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर -धनंजय पांढरे

एका क्षणाची चूक आणि अनेक मुक्या जीवांचा जीव धोक्यात आला असता; मात्र लोको पायलटच्या प्रसंगावधानामुळे रानगव्यांच्या कळपाला नवे जीवन मिळाले. २५ ऑक्टोबर रोजी नागभीडजवळ रेल्वे रुळांवर अचानक रानगव्यांचा कळप दिसताच लोको पायलट पप्पू शर्मा यांनी मालगाडी थांबविली. कळपातील प्रत्येक रानगवा सुरक्षितपणे रुळ ओलांडून जाईपर्यंत त्यांनी गाडी थांबवून ठेवली. मुक्या जीवांच्या जिवाची पर्वा करत दाखविलेल्या या संवेदनशीलतेने वन्यजीव संरक्षणाचा एक हृदयस्पर्शी आदर्श निर्माण केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, २५ ऑक्टोबर रोजी नागभीडजवळून मालगाडी जात असताना लोको पायलट पप्पू शर्मा यांना अचानक रेल्वे रुळांवर रानगव्यांचा कळप दिसला.

भरधाव धावणाऱ्या रेल्वेसमोर अचानक आलेल्या या वन्यजीवांना धोका निर्माण होऊ शकतो, हे लक्षात येताच त्यांनी प्रसंगावधान राखले. मालगाडीची गती कमी करत त्यांनी गाडी थांबविली. रानगव्यांचा संपूर्ण कळप सुरक्षितपणे रेल्वे रुळ ओलांडून जाईपर्यंत त्यांनी संयमाने प्रतीक्षा केली. सर्व रानगवे सुरक्षितपणे दुसऱ्या बाजूला गेल्यानंतरच मालगाडी पुढे रवाना झाली.

या घटनेचे चित्रीकरण लोको पायलट पप्पू शर्मा यांनी आपल्या भ्रमणध्वनीत केले. या प्रसंगातून त्यांची वन्यजीवांप्रती असलेली संवेदनशीलता आणि मुक्या प्राण्यांच्या जीवाबद्दलची आस्था दिसून आली. वेळेवर घेतलेल्या एका निर्णयामुळे अनेक वन्यजीवांचे प्राण वाचले. त्यांच्या या कृतीचे वन्यजीवप्रेमींकडून कौतुक होत आहे.

आजच्या काळात रेल्वेच्या धडकेत वन्यप्राण्यांचा मृत्यू होण्याच्या घटना चिंतेचा विषय बनल्या आहेत. जंगलातून जाणाऱ्या रेल्वेमार्गांवर वन्यजीवांचा वावर असताना अनेकदा त्यांना जीव गमवावा लागतो. अशा घटनांमुळे निसर्गातील जैवविविधतेचे मोठे नुकसान होते. या पार्श्वभूमीवर नागभीडजवळ घडलेली ही घटना दिलासा देणारी ठरली आहे.

माणुसकी केवळ माणसांपुरती मर्यादित नसते, तर ती मुक्या जीवांप्रती दाखविलेल्या करुणेतूनही व्यक्त होते. लोको पायलट पप्पू शर्मा यांनी मालगाडी थांबवून रानगव्यांना सुरक्षित मार्ग दिला आणि कृतीतून हेच दाखवून दिले. विकासाच्या वेगात निसर्ग आणि वन्यजीवांकडे दुर्लक्ष होता कामा नये, याची जाणीव करून देणारी ही घटना आहे. मुक्या जीवांना जगण्याची संधी देणारा हा संवेदनशील क्षण वन्यजीव संरक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश देऊन जातो.

दिग्दर्शक बी.पी सिंह यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

वृत्तसंस्था, मुंबई

भारतीय टेलिव्हिजन विश्वातून एक दुःखद बातमी समोर येत आहे. 'सीआयडी' आणि 'आहट' अशा कल्ट आणि आयकॉनिक शोचे दिग्गज प्रॉड्यूसर आणि दिग्दर्शक बी.पी सिंह (बृजेंद्र पाल सिंह) यांचं निधन झालं आहे. टेलिव्हिजन आणि सिने आर्टिस्ट असोसिएशनचे सदस्य आणि ज्येष्ठ अभिनेते अमित बहल यांनी बी.पी सिंह यांच्या निधनाची माहिती दिली. त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच टेलिव्हिजन विश्वात दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

माहितीनुसार, फिल्ममेकर अशोक पंडित यांनीही बी.पी सिंह यांच्या निधनावर आपला



शोक व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बी.पी सिंह यांचं निधन हृदयविकाराच्या झटक्याने झाले असल्याची माहिती आहे.

अशोक पंडितने सोशल मीडियावर बीपी सिंह यांच्या निधनाची माहिती दिली. त्यांनी पोस्ट शेअर केली आहे. पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की, 'दिग्गज निर्माते आणि दिग्दर्शक बी.पी सिंह यांचे निधन झाले आहे. त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच प्रचंड दुःख झाले. आज सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला असून, हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचं निधन झाले असल्याची माहिती आहे'.

अशोक पंडित यांनी दिलेल्या माहितीनुसार, बी.पी सिंह यांच्यावर २८ ऑक्टोबर म्हणजेच उद्या अंत्यसंस्कार होणार आहे. त्यांची भावूक पोस्ट सध्या सोशल मीडियात व्हायरल होत आहे. त्यांनी ही पोस्ट आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केली आहे. अशोक पंडित यांच्या पोस्टवर अनेकांनी कमेंट करुन श्रध्दांजली वाहिली आहे.

संपादकीय लेखणीतून...

तिजोरीवर बोझा

महाराष्ट्राच्या तिजोरीवर दिवसेंदिवस कर्जाचा बोजा वाढत चालला आहे. राज्याच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पानुसार सरकारचे एकूण कर्ज सुमारे ११ लाख कोटी रुपयांच्या पुढे जाण्याचा अंदाज आहे. आर्थिक तूटही १.५० लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे त्यामुळे राज्यावर कर्जाचं भार हा विषय सध्या चर्चेत आहे. लाडकी बहीण योजना, शेतकरी मदत, सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पेन्शन यावर मोठा खर्च होत आहे तर रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर विकास कामांची हजारो कोटींची बिले थकल्याचे कंत्राटदार संघटनांचे म्हणणे आहे. यामुळे सरकारकडे विकास कामांसाठी पुरेसा पैसा शिल्लक आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो.

वाढत्या कर्जामुळे राज्याच्या आर्थिक स्थितीवर नेमका किती परिणाम होणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे. लाडकी बहीण योजनेसाठी २०२६-२७ मध्ये २६,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याच वेळी कंत्राटदार संघटनांनी एप्रिल २०२६ मध्ये सरकारकडे सुमारे ९६,४०० कोटी रुपयांची बिले थकल्याचा दावा केला होता त्यामुळे राज्याच्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत आहे का? अशी चर्चा सुरू झाली शिवाय जुन्या कर्जाचे व्याज फेडण्यासाठी सरकारला दरवर्षी हजारो कोटी रुपये खर्च करावे लागत आहेत. अशा परिस्थितीत कर्ज आणखी वाढल्यास त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसणार का? लाडकी बहीण योजनेचा खर्च आणि कंत्राटदारांची थकीत बिले यांचे काय होणार? राज्याची आर्थिक घडी खरंच बिघडण्याचा मार्गावर आहे का? असे प्रश्न निर्माण होतात. महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक राज्य आहे. उद्योगधंदे, व्यापार आणि करांमधून सरकारला मोठं उत्पन्न मिळतं; पण त्याच वेळी सरकारी खर्चही झपाट्याने वाढत आहे.

राज्यावरील एकूण कर्ज सुमारे ११ लाख २ हजार ६५४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. यंदाची राजकोषीय तूट १ लाख ५० हजार ४९१ कोटी रुपये अपेक्षित आहे म्हणजेच सरकारला मिळणाऱ्या पैशापेक्षा खर्च जास्त आहे. ही तूट भरून काढण्यासाठी सरकारला आणखी कर्ज घ्यावे लागेल. आधीच्या कर्जावरील व्याज भरणे आणि नव्या खचासाठी पैसे उभे करणे, अशी दुहेरी जबाबदारी सरकारसमोर आहे. एवढा खर्च होतो तरी कुठे? सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन, पेन्शन, जुन्या कर्जाचे व्याज, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि विविध कल्याणकारी योजनांसाठी मोठा निधी लागतो. त्यात लाडकी बहीण योजनेचा खर्च आणि कंत्राटदारांची थकीत बिले यांची भर पडते. यंदा केवळ कर्जाच्या व्याजापोटी सुमारे ७० लाख ५५ कोटी रुपये खचाचे लागतील शिवाय सरकारच्या नियमित उत्पन्नापेक्षा नियमित खर्च ४० हजार ५५२ कोटी रुपयांनी जास्त राहण्याची शक्यता आहे. ही महसुली तूट कमी करण्याचा प्रयत्न कराया लागेल. वाढत्या कर्जामुळे राज्य लगेच आर्थिक संकटात सापडेल, असे नाही; पण कर्ज वाढत असताना भविष्यातील विकास कामे, सरकारी सेवा आणि योजनांसाठी पुरेसा पैसा उरेल का? राज्याच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा गत काही वर्षात झपाट्याने वाढला आहे. एकेकाळी सुमारे ४ लाख कोटींच्या घरात असलेले कर्ज आता ११ लाख कोटींच्या घरात पोहोचले आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणात कर्ज वाढण्याचे कारण म्हणजे रस्ते, महामार्ग, मेट्रो, सिंचन आणि इतर मोठ्या विकास कामांसाठी घेण्यात आलेले कर्ज त्यातच सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्ती वेतन आणि जुन्या कर्जावरील व्याजाचा खर्च वाढत गेला. कोरोना काळात महसूल घटला; पण आरोग्य सेवा आणि मदतीवरील खर्च वाढले. यामुळे उत्पन्न आणि खर्चातील दरी भरून काढण्यासाठी पुन्हा कर्ज घेण्याची वेळ आली. कजार्तून रोजगार, उद्योग आणि पायाभूत सुविधा वाढल्या तर भविष्यात महसूलही वाढू शकतो; मात्र उत्पन्नापेक्षा नियमित खर्च वाढला तर राज्याच्या आर्थिक नियोजनावर अधिक ताण येऊ शकतो.

मान्यता मिळूनही शिक्षक 'शालार्थ आयडी'च्या प्रतीक्षेत; अल्पसंख्यांक कनिष्ठ महाविद्यालयांतील चित्र

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

महाराष्ट्रभरातील अल्पसंख्यांक कनिष्ठ महाविद्यालयांतील अनेक शिक्षक अधिकृत मान्यता मिळूनही केवळ 'शालार्थ आयडी' न मिळाल्यामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून किंवा वर्षांपासून वेतनापासून वंचित आहेत. शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे आणि तांत्रिक त्रुटींमुळे या शिक्षकांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

कनिष्ठ महाविद्यालयीन प्रशासनाकडून आणि शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून शिक्षकांच्या नियुक्तीला मंजुरी मिळालेली आहे. मात्र, शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट न झाल्याने त्यांचे वेतन सुरू होऊ शकलेले नाही. अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या महाविद्यालयांमध्ये भरती प्रक्रियेचे नियम काहीसे वेगळे असतात. तेथे अनेकदा पवित्र पोर्टलशिवाय पदभरती होते. मात्र, या शिक्षकांच्या कागदपत्रांची पडताळणी आणि 'शालार्थ आयडी' देण्याच्या प्रक्रियेत शिक्षण विभागाकडून प्रचंड विलंब केला जात आहे.

अल्पसंख्यांक कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना वैयक्तिक मान्यता मिळूनही शालार्थ आयडी न मिळण्ये ही सद्यस्थितीत एक गंभीर आणि तांत्रिक समस्या बनली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेल्या निर्णयानुसार, एकदा सक्षम प्राधिकाऱ्याने (शिक्षणाधिकारी/उपसंचालक) नियुक्तीला मंजुरी दिली की, संबंधित शिक्षक शालार्थ आयडीसह सर्व लाभांसाठी पात्र ठरतो. असे असूनही आयडी मिळी नसल्याने अनेक शिक्षक पगारापासून वंचित आहे.

नागपूरसह राज्यभरात बोगस शालार्थ आयडी तयार करून कोट्यवधी रुपयांचा पगार उचलल्याचा घोटाळा समोर आला होता. यानंतर शासनाने विशेष तपास पथक स्थापन केले असून राज्यभरातील सुमारे ४ लाख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रांची डिजिटल सेवा पुस्तकाद्वारे पुनर्तपासना आणि तपासणी सुरू आहे. या घोटाळ्यात शिक्षण विभागातील अनेक उच्चपदस्थ अधिकारी आणि शिक्षण उपसंचालकांवर गुन्हे दाखल झाले असून काहींना अटकही झाली आहे. यामुळे वैध नियुक्त्यांच्या फाइल्सवरही स्वाक्षरी करण्यास किंवा नवीन आयडी मंजूर करण्यास अधिकारी सध्या अत्यंत सावध भूमिका घेत आहेत व दिरंगाई होत आहे.

गेल्या काही काळापासून संपूर्ण महाराष्ट्रात 'शालार्थ आयडी घोटाळा' समोर आला आहे. यामुळे शिक्षण विभागाने नवीन शालार्थ आयडी देण्याची आणि जुन्या नोंदी तपासण्याची प्रक्रिया अत्यंत कडक केली आहे. मूळ कागदपत्रांची पुनर्तपासना आणि पोर्टलवर ती पुन्हा अपलोड करण्याची पडताळणी सुरू असल्यामुळे या प्रक्रियेला विलंब होत असल्याची माहिती समोर आली आहे.

शिक्षण विभागाने नवीन शालार्थ प्रणाली २.० लागू केली आहे. यामध्ये जोपर्यंत जुने अभिलेख आणि संस्थेची संपूर्ण माहिती ऑनलाइन मॅच होत नाही, तोपर्यंत सिस्टीम 'एरर' दाखवते आणि आयडी जनरेट होत नाही. अल्पसंख्यांक शाळांमधील पदभरती व समायोजन बिगर-अल्पसंख्यांक शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांचे अल्पसंख्यांक शाळांमध्ये समायोजन करण्याच्या नियमांवरून शासन स्तरावर तपासणी सुरू असते. संचमान्यता आणि बिंदूनामावली मधील त्रुटींमुळे कनिष्ठ महाविद्यालयीन प्रस्तावांवर उपसंचालक कार्यालयात विलंब होतो.

अनेकदा शिक्षणाधिकारी स्तरावर मान्यता मिळते, मात्र अंतिम शालार्थ आयडी जनरेट करण्याचा अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे असतो. तिथे प्रस्तावांची नव्याने छाननी केली जाते.

शालार्थ आयडी घोटाळ्यानंतर शिक्षण विभागाने शालार्थ आयडी मंजूर करण्यासाठी नवी आणि अत्यंत कडक कार्यपद्धती लागू केली आहे. यामध्ये विभागीय उपसंचालकांच्या मोबाईलवरील ओटीपी अनिवार्य करण्यात आला आहे.रखडलेल्या शालार्थ आयडीमुळे कायदेशीर शिक्षकांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने शालार्थ आयडी मंजूर करण्यासाठी आता निश्चित कालमर्यादा ठरवून दिली आहे. यामध्ये शिक्षणाधिकाऱ्यांना प्रस्तावांची छाननी करण्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली आहे, जेणेकरून प्रक्रियेला गती मिळेल. वरील प्रमाणे कार्यपद्धती व कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली असली तरी देखील या ना त्या कारणाने शालार्थ आयडी शिक्षकांना मिळत नसल्यामुळे शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

यावर काय उपाय किंवा पुढील पावले उचलावीत?

नवीन कालमर्यादा शासन निर्णयाचा संदर्भ घेणे: महाराष्ट्र शासनाने शालार्थ आयडी मंजूर करण्यासाठी प्रत्येक टप्प्याची कालमर्यादा निश्चित करणारा जीआर जारी केला आहे. जर ठराविक वेळेत काम झाले नाही, तर संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित केली जाते.

संस्थेकडून ऑनलाइन स्टेटस तपासणे: कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी/संस्थेने शालार्थ पोर्टलच्या लॉगइनवरून प्रस्ताव कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे (उदा. लिपिक, अधीक्षक किंवा उपसंचालक) आणि काही त्रुटी काढली आहे का, याची पडताळणी करावी.

जर सर्व कागदपत्रे वैध असूनही केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे किंवा तांत्रिक कारणांमुळे शालार्थ आयडी रोखून धरला असेल, तर शिक्षक संघटनांच्या माध्यमातून किंवा कायदेशीर सल्ला घेऊन मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्याचा पर्यायही अनेक शिक्षक निवडतात, कारण न्यायालयाच्या आदेशानंतर शालार्थ आयडी मिळण्याची प्रक्रिया जलद होते.

उच्च न्यायालयाने अशा अनेक प्रकरणांमध्ये ४ ते ६ आठवड्यांत शालार्थ आयडी देण्याचे थेट आदेश शिक्षण उपसंचालकांना दिले आहेत.

शिक्षकांनी आपल्या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनामार्फत विभागीय उपसंचालक कार्यालयात लेखी पाठपुरावा करणे अत्यंत आवश्यक आहे.

- ९५६१५१४३०६

दीप्ती शर्मा : तिन्ही प्रकारांत प्रभाव, अष्टपैलू गुणवत्तेचा जागतिक ठसा!

विश्वचषकातील सुवर्णकामगिरी, ३८४ आंतरराष्ट्रीय बळी आणि आयसीसी क्रमवारीतील मानाचे स्थान; भारतीय महिला क्रिकेटची विश्वासार्ह आधारस्तंभ

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेटमध्ये फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागांत सातत्य राखणे सोपे नसते. पण भारतीय महिला क्रिकेटची अष्टपैलू खेळाडू आणि वनडे संघाची उपकर्णधार दीप्ती शर्मा हिने आपल्या कामगिरीतून या दोन्ही कौशल्यांचा प्रभावी संगम साधला आहे. विक्रमी फलंदाजी, अचूक ऑफ-स्पिन गोलंदाजी आणि निर्णायक सामन्यांतील योगदान यामुळे ती जागतिक महिला क्रिकेटमधील आघाडीच्या अष्टपैलू खेळाडूंपैकी एक बनली आहे.

तिन्ही प्रकारांतील दमदार आकडेवारी

२६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत उपलब्ध कारकीर्दीच्या आकडेवारीनुसार, दीप्तीने कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मिळून ३८४ बळी आणि ३,५२८ धावा केल्या आहेत. तिची तिन्ही प्रकारांतील कामगिरी तिच्या अष्टपैलू गुणवत्तेची साक्ष देते.

या आकडेवारीतून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एकदिवसीय क्रिकेटमध्ये दीप्तीची फलंदाजी अधिक भक्कम असून तिची गोलंदाजीही सातत्यपूर्ण आहे. दुसरीकडे, टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तिच्या बळींची संख्या १९१ पर्यंत पोहोचली आहे. कमी षटकांच्या खेळातही ती प्रतिस्पर्ध्यांसाठी मोठे आव्हान ठरते.

१८८ धावांपासून २०२६ मधील शतकापर्यंत!

२०१७ मध्ये आयर्लंडविरुद्ध दीप्तीने १८८ धावांची ऐतिहासिक खेळी केली. भारतीय महिला एकदिवसीय क्रिकेटमधील ही सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. तब्बल नऊ वर्षे आणि पाच महिन्यांनंतर, २६ ऑक्टोबर २०२६ रोजी झिम्बाब्वेविरुद्ध तिने नाबाद १०६ धावा करून आपल्या कारकिर्दीतील दुसरे एकदिवसीय शतक झळकावले. या दोन शतकांमधील दीर्घ अंतर तिच्या फलंदाजीतील प्रवास अधोरेखित करते. स्वतःच्या तांत्रिक मर्यादा ओळखून त्यावर मेहनत घेण्याची तिची वृत्ती महत्त्वाची आहे. २०२१ मध्ये देशांतर्गत क्रिकेटमध्ये ११३ धावा करूनही प्रशिक्षक चरणजीत सिंग यांनी तिच्या ऑफ-साइडच्या खेळातील उणिवा दाखवून दिल्या होत्या. दीप्तीने ही टीका स्वीकारली आणि आपल्या फलंदाजीतील विविध पर्याय सुधारण्यावर भर दिला. तिच्या यशामागे गुणवत्ता जितकी महत्त्वाची आहे, तितकीच शिकण्याची तयारीही आहे.

आयसीसी क्रमवारीत अष्टपैलू गुणवत्तेचा ठसा

आयसीसीच्या उपलब्ध क्रमवारीनुसार दीप्तीचे स्थान जागतिक क्रिकेटमध्ये लक्षणीय आहे.

एकदिवसीय अष्टपैलू खेळाडू : सहावे स्थान

टी-२० अष्टपैलू खेळाडू : चौथे स्थान

टी-२० गोलंदाज : दुसरे स्थान हे क्रमांक ऑक्टोबर २०२६ मधील उपलब्ध नोंदींनुसार आहेत.

टी-२० गोलंदाजी क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर पोहोचणे हे विशेष महत्त्वाचे आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये आशिया चषक स्पर्धेत १४ बळी मिळवून ती स्पर्धेतील सर्वाधिक बळी घेणारी गोलंदाज ठरली होती. या कामगिरीमुळे तिच्या क्रमवारीत चार स्थानांची सुधारणा झाली. क्रमवारीतील स्थान हे केवळ प्रतिष्ठेचे प्रतीक नसते; ते विविध प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध केलेल्या कामगिरीचे आणि सातत्याचे प्रतिबिंब असते. फलंदाज म्हणून तिचे एकदिवसीय क्रिकेटमधील सहावे सर्वोच्च अष्टपैलू स्थान आणि टी-२० मधील चौथे स्थान तिच्या दोन्ही कौशल्यांना मिळालेली जागतिक मान्यता दर्शवते.

विश्वचषक विजयात निर्णायक भूमिका

२०२५ च्या महिला एकदिवसीय विश्वचषकात दीप्तीने भारताच्या ऐतिहासिक विजेतेपदात मोलाचा वाटा उचलला. संपूर्ण स्पर्धेत २२ बळी आणि २१५ धावा अशी कामगिरी करत तिने स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळवला. अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ३९ धावांत पाच बळी आणि फलंदाजीत ५८ धावा करून तिने आपल्या अष्टपैलू गुणवत्तेचा सर्वोत्तम प्रत्यय दिला. अंतिम सामन्यातील ही कामगिरी केवळ आकडेवारी नव्हती; ती निर्णायक क्षणी जबाबदारी स्वीकारण्याची क्षमता होती. अशा खेळाडूंमुळेच संघाला कठीण परिस्थितीत विजयाचा विश्वास मिळतो.

उपकर्णधार म्हणून पुढील आव्हान

भारतीय वनडे संघाची उपकर्णधार म्हणून दीप्तीवर आता वैयक्तिक कामगिरीसोबत संघाला दिशा देण्याची जबाबदारीही आहे. गोलंदाजीतील अचूकता, फलंदाजीतील संयम आणि परिस्थितीनुसार खेळ बदलण्याची क्षमता या तिच्या जमेच्या बाजू आहेत. फलंदाजीतील आक्रमकता आणि डावाच्या अखेरीस धावगती वाढवण्याची क्षमता आणखी विकसित झाल्यास तिचे योगदान अधिक प्रभावी ठरू शकते. दीप्ती शर्मा ही केवळ विक्रमांची खेळाडू नाही; ती भारताच्या सामन्यांचे पारडे बदलू शकणारी अष्टपैलू शक्ती आहे.

तिन्ही आंतरराष्ट्रीय प्रकारांतील तिची कामगिरी, टी-२० मधील बळींचा विक्रम, आयसीसी क्रमवारीतील स्थान आणि विश्वचषकातील निर्णायक योगदान यांमुळे तिचे स्थान जागतिक महिला क्रिकेटमध्ये भक्कम झाले आहे. तिच्या कारकिर्दीचा खरा संदेश हाच, प्रतिभेला मेहनतीची जोड आणि आत्मपरीक्षणाची तयारी मिळाली, तर यशाला नवी उंची गाठता येते. क्रिकेटच्या तिनही प्रारूपातील पैलू खेळामुळे व विश्वचषक विजयात मोलाचा वाटा उचलल्या बद्दल युपी सरकारने आपल्या पोलिस दलात मानाच्या डिएसपी पदावर नियुक्त करून दिप्तीला सन्मानीत केले आहे.

- ९०९६३७२०८२

कलाकार दिन : जगभरातील कलाकारांच्या सर्जनशीलतेचे व योगदानाचे कौतुक

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

आंतरराष्ट्रीय कलाकार दिन- इंटरनॅशनल आर्टिस्ट डे दरवर्षी २५ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश जगभरातील कलाकारांच्या सर्जनशीलतेचा आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करणे हा आहे. या दिवसाच्या माध्यमातून चित्रकला, शिल्पकला, नृत्य, संगीत, साहित्य आणि इतर कलाप्रकारांतील कलाकारांचे कौतुक करण्यात येते, कारण त्यांच्या कलाकृतींमुळे समाजात सौंदर्य, संस्कृती आणि विचारशक्तीला चालना मिळते. कलाकार त्यांच्या अनोख्या दृष्टिकोनातून समाजातील विविध समस्यांवर प्रकाश टाकतात आणि लोकांना प्रेरित करतात. कला ही व्यक्त होण्याचे शक्तिशाली साधन आहे, जी सांस्कृतिक वारसा जपण्यासोबतच बदल घडवून आणण्यासाठी देखील वापरली जाते. संपूर्ण जगभरात २५ ऑक्टोबर रोजी जागतिक कलाकार दिन साजरा केला जातो.



महत्त्वाची माहिती: उद्देश: हा दिवस जगभरातील चित्रकार, शिल्पकार, संगीतकार, लेखक, नृत्यकलाकार आणि सर्व प्रकारच्या सृजनशील कलाकारांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी व त्यांच्या कलेचा उत्सव साजरा करण्यासाठी पाळला जातो. इतिहास: कॅनेडियन कलाकार "क्रिस मॅकक्लर" यांनी सन २००४ मध्ये या दिवसाची सुरुवात केली.

प्रेरणा: विसाव्या शतकातील जगप्रसिद्ध महान चित्रकार पाब्लो पिकासो यांचा जन्म दि. २५ ऑक्टोबर १८८१ रोजी झाला होता, त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

महत्त्व: कलेच्या माध्यमातून समाजात विचार, संस्कृती आणि सर्जनशीलता जिवंत ठेवणाऱ्या कलाकारांना मानाचे स्थान देणे आणि तरुण पिढीला कलेकडे आकर्षित करणे, हा यामागचा मुख्य हेतू असतो. (टीप: २५ ऑक्टोबर रोजी "जागतिक कलाकार दिन" असतो, तर १५ एप्रिल रोजी "जागतिक कला दिन-वर्ल्ड आर्ट डे" साजरा केला जातो जो लिओनार्डो दा विशी यांच्या जन्मदिनानिमित्त पाळला जातो).

संपूर्ण जगभरात २५ ऑक्टोबर रोजी जागतिक कलाकार दिन साजरा केला जातो. हा दिवस कला आणि सर्जनशीलतेचा उत्सव आहे, जो जगभरातील विविध कलाकारांना सन्मान देण्याचे कार्य करतो. चित्रकार, शिल्पकार, संगीतकार, लेखक, नृत्यकलाकार आणि इतर विविध कलेच्या क्षेत्रातील व्यक्तींना या दिवशी मान्यता दिली जाते. कलेच्या माध्यमातून कलाकारांनी समाजात मोलाची भूमिका बजावली आहे आणि जागतिक कलाकार दिन त्यांचा सन्मान करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण संधी आहे.

कलाकारांचा महत्त्वाचा वाटा: कलेच्या प्रत्येक प्रकारात काहीतरी विशेष असते, जे लोकांना विचार करण्यास, प्रेरणा घेण्यास, आणि भावनिक स्वरूपाची अनुभूती करण्यास प्रवृत्त करते. कलाकार आपल्या कलाकृतीद्वारे समाजातील विविध समस्या, भावना, आणि आशय मांडतात. त्यांचे योगदान केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नसून ते समाजाच्या मानसिक आणि सांस्कृतिक विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरते. चित्रकला, संगीत, नृत्य, साहित्य, थिएटर इत्यादी माध्यमांद्वारे कलाकारांनी मानवतेचे विविध पैलू दर्शवले आहेत. त्यांच्या सर्जनशीलतेने सामाजिक बदलांना चालना दिली, ऐतिहासिक घटनांची साक्ष दिली आणि जगभरात शांततेचा संदेश दिला.

कला आणि समाज: कलाकार हे समाजाच्या आरशासारखे काम करतात. त्यांचे कार्य समाजाच्या मनस्थितीचे आणि मूल्यांचे प्रदर्शन असते. त्यांनी कधी कधी स्वातंत्र्य चळवळ, मानवाधिकार, पर्यावरण संवर्धन, आणि शांतता या गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. कलाकारांच्या कार्यातून समाजाला विचार करण्यास, आत्मपरीक्षण करण्यास आणि बदल करण्यास प्रवृत्त केले जाते. आजच्या डिजिटल युगातही कलेचे स्वरूप बदलले असले, तरी तिचे महत्त्व कमी झालेले नाही. चित्रकारांची कलाकृती ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होत आहे, संगीत डिजिटल माध्यमांतून लोकांपर्यंत पोहचत आहे आणि साहित्यिकांच्या रचनांची डिजिटल वाचनासाठी उपलब्धता वाढली आहे.

जागतिक कलाकार दिनाचे उद्दिष्ट: जागतिक कलाकार दिन साजरा करण्याचे उद्दिष्ट म्हणजे कलावंतांच्या कार्याचे कौतुक करणे, त्यांना प्रेरित करणे, आणि त्यांच्या कार्याचे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक योगदान मान्य करणे. याचबरोबर, कला आणि सर्जनशीलता यांचा आदर वाढवून नवोदित कलाकारांना प्रोत्साहित करणे, हेही या दिनाचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे. कलाकारांनी जपलेली कला मानवाच्या भावविश्वाचा एक महत्त्वाचा भाग आहे. कला केवळ सौंदर्याची निर्मिती नसून ती विचारांची एक प्रवृत्ती आहे. समाजाला प्रगत आणि सर्जनशील बनवण्यासाठी कलाकारांचा असलेला महत्त्वाचा वाटा यापुढेही अधोरेखित होत राहील.

निष्कर्ष : जागतिक कलाकार दिन हा केवळ कलाकारांचा सन्मान करण्याचा दिवस नाही तर, कला आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्याचा एक सुंदर प्रयत्न आहे. हा दिवस साजरा करताना आपण कलेच्या माध्यमातून आपले जीवन अधिक समृद्ध करू शकतो, कारण कला हीच एक प्रेरणा आहे, जी आपल्याला विचार करण्याची, समजून घेण्याची आणि नवीन दृष्टिकोन शोधण्याची प्रेरणा देते. जागतिक कलाकार दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने कलेला प्रोत्साहित करावे आणि आपल्या समाजातील कलाकारांच्या कार्याचा सन्मान करावा.

- ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

मुजोर फायनान्स कंपन्यांवर थेट गुन्हे दाखल होणार

३०४ तालुक्यांत चारा,सिंचन योजनांचा गती, मंत्रिमंडळ उपसमितीचे निर्णय, जिल्हाधिकाऱ्यांना चारा खरेदीचे अधिकार, बंद पाणी योजना तात्काळ सुरू करण्यासाठी डीपीसीतून निधी

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

राज्यात दुष्काळाची दाहकता वाढल्याने बळीराजा आणि जनावरांसाठी महत्वपूर्ण पावले सरकारने उचलली आहेत. दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांमध्ये चारा टंचाई दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय समितीला चारा खरेदी व लागवडीचे सर्वाधिकार देण्यात आले आहेत. याचबरोबर केवळ थकबाकी किंवा वीज जोडणीअभावी बंद पडलेल्या ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजना तात्काळ सुरू करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून थेट निधी देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती राज्य मंत्रिमंडळ दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष व महसूल



मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

उपसमितीची बैठक समितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ सचिव उपस्थित होते.

चाऱ्यासाठी 'मास्टर प्लॅन': सुका १२ तर ओला चारा ८ रुपये किलो

जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होऊ नये म्हणून जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय समिती स्थापन केली आहे. चारा खरेदी, स्थानिक पातळीवर लागवड किंवा इतर जिल्ह्यांतून आवक करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असतील. शासनाच्या नवीन एसओपीनुसार सुका चारा १२ रुपये प्रति किलो आणि ओला चारा ८ रुपये प्रति किलो या दराने उपलब्ध केला जाईल. वन, महसूल व जलसंपदा विभागाच्या उपलब्ध जमिनींवर डीपीसी निधीतून चारा लागवड होणार आहे. तसेच सिंधुदुर्ग व रत्नागिरीतील मुबलक चारा दुष्काळी जिल्ह्यांकडे वळवला जाईल.

वीज कनेक्शनअभावी बंद नळ योजना तात्काळ सुरू होणार

पाणी उपलब्ध असूनही केवळ वीज बिल थकल्याने किंवा नवीन वीज जोडणी नसल्याने बंद पडलेल्या योजना डीपीसीच्या निधीतून तात्काळ कार्यान्वित केल्या जातील. यामुळे टँकरवर होणारा उधळपट्टीचा खर्च टळणार असून गावकऱ्यांना थेट पिण्याचे पाणी उपलब्ध होईल.

करदाते अन् अधिकाऱ्यांना ५ हजार रुपयांचे अनुदान नाही

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणाऱ्या ५,००० रुपयांच्या अनुदानातून इन्कम टॅक्स भरणारे शेतकरी, शासकीय अधिकारी-कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी यांना वगळण्यात आले आहे. कर्जमाफीच्या धर्तीवरच हे निकष कडकपणे लागू केले जातील.

गाळ काढा, शेतात न्या; सरकार देणार मदतीचा हात

तलाव व धरणांतील गाळ काढण्यासाठी आणि तो शेतात पसरवण्यासाठी सरकार आर्थिक मदत करणार आहे. गाळ उपसासाठी ३१ रुपये प्रति क्युबिक मीटर आणि शेतात वाहून नेण्यासाठी ३५ रुपये प्रति क्युबिक मीटर अनुदान दिले जाईल. रस्त्यांच्या कामांसाठी तलावांतील माती, मुरुम आणि गिट्टी वापरल्यास रॉयल्टी (स्वामित्वधन) पूर्णपणे माफ असेल.

मुजोर फायनान्स कंपन्यांवर ठोकणार गुन्हे

दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांच्या मागे तगादा लावून त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या मायक्रो फायनान्स व खासगी वित्त कंपन्यांना बैठकीत स्पष्ट इशारा देण्यात आला. नदिडमधील घटनेच्या धर्तीवर, शेतकऱ्यांना मानसिक त्रास देणाऱ्या कंपन्यांच्या अधिकारी व वसुली एजंट्सवर थेट पोलीस गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

आणखी तालुक्यांचा होणार समावेश

मंत्रालयातील बैठकीनंतर उपसमिती अध्यक्षांनी स्पष्ट केले की, पुणे जिल्ह्यातील हवेली, मावळ, मुळशी तर कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले यांसह कोकणातील काही भागांतून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा ग्राउंड रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर पुढील मंगळवारच्या बैठकीत या नव्या तालुक्यांचा दुष्काळ यादीत समावेश करण्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

थोडक्यात

रब्बी हंगामात कमी पाण्याच्या पिकांची निवड करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

ज्वारी, हरभरा, करडईच्या लागवडीचे कृषी विभागाचे आवाहन; रब्बी ज्वारीचे मिनीकिटही मिळणार

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

कमी पावसामुळे तालुक्यात पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता असून, त्याचे सावट आता रब्बी हंगामावरही पडण्याची चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचे नियोजन करून कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांची निवड करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने केले आहे. रब्बी हंगामात रब्बी ज्वारी, हरभरा आणि करडई या तुलनेने कमी पाण्याची गरज असलेल्या पिकांना प्राधान्य द्यावे. विशेषतः जिरायती क्षेत्रातील शेतकऱ्यांनी जमिनीतील ओलावा, पावसाची स्थिती आणि उपलब्ध पाण्याचा विचार करूनच पेरणीचे नियोजन करावे. पाण्याचा अपव्यय टाळून गरजेनुसार संरक्षित सिंचनाचा वापर करावा, असे कृषी विभागाने सुचविले आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांना कमी पाण्याच्या परिस्थितीतही पीक उत्पादन घेता यावे, वासाठी कृषी विभागामार्फत रब्बी ज्वारीचे मिनीकिट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वासंदर्भात अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी गावातील कृषी सहाय्यक किंवा मंडळ कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सुप्रिया कोकणी यांनी केले आहे.

पाण्याचे नियोजन हाच पर्याय

संभाव्य दुष्काळी परिस्थितीत पारंपरिक पीक नियोजनाऐवजी उपलब्ध पाण्याच्या क्षमतेनुसार पिकांची निवड करणे महत्त्वाचे ठरणार आहे. वेळीच नियोजन केल्यास पाण्याची बचत होण्यासोबतच संभाव्य पीक नुकसान कमी करण्यास मदत होऊ शकते.

किरकोळ वादातून १७ वर्षीय मित्रावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला

एकाला अटक, ५ अल्पवयीन ताब्यात, नांदा शिवारातील उड्डाणपुलाखालील घटना

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

स्थानिक पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नांदा शिवारात २६ ऑक्टोबर सोमवारला रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलावर किरकोळ वादातून धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला करण्यात आला याप्रकरणी खापरखेडा पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून पाच विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले आहे. नयन भरत सोनेकर वय १८ वर्षे ४ महिने रा वार्ड क्रमांक ३ संभाजीनगर महादुला कोराडी असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून १५ ते १७ वर्षे वयोगटातील अन्य पाच अल्पवयीन बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार गंभीर जखमी १७ वर्षीय मुलगा लोणखैरी येथील रहिवासी आहे नांदा शिवारातील उड्डाणपुलाखाली एका पानटेल्यासमोर आरोपी व जखमी आणि त्यांचे अल्पवयीन मित्र एकत्र आले होते यावेळी आपसात किरकोळ कारणावरून वाद झाला वादाचे रूपांतर हाणामारीत होताच आरोपी नयन सोनेकरसह पाच अल्पवयीन मुलांनी १७ वर्षीय मित्रावर धारदार शस्त्राने अचानक प्राणघातक हल्ला केला. सदर हल्ल्यात १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले. गंभीर जखमीचा मित्र अल्पवयीन फिर्यादीच्या तक्रारीवरून खापरखेडा पोलिसांनी घटनेतील आरोपी विरुद्ध प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली विलास करंगामी करत आहेत.

जि. प. हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा नवेगाव येथे ९८ विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप

राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती; शिक्षकांनी दिला निरोगी राहण्याचा संदेश



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

पंचायत समिती सालेकसा अंतर्गत केंद्र सोनपुरी येथील जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा नवेगाव येथे राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त ६ ते १४ वर्षे वयोगटातील एकूण ९८ विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. मुलांना पोटातील जंतांच्या संसर्गापासून वाचविणे तसेच त्यांचे आरोग्य आणि शारीरिक विकास सुधारणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक एस. एम. दसरिया, पदवीधर शिक्षक राजकुमार बसोने, सहायक शिक्षक योगेश चंदनकर, स्वयंसेविका साक्षी भंडारी, आरोग्य सेवक ए. आर. शेटे तसेच आशा सेविका तनुजा दमाहे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान पदवीधर शिक्षक राजकुमार बसोने यांनी विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे महत्त्व समजावून सांगितले. पोटात जंत झाल्यामुळे मुलांच्या आरोग्यावर, पोषणावर, शारीरिक विकासावर तसेच अभ्यासावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. जंतांच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी वैयक्तिक स्वच्छता राखणे, जेवणापूर्वी आणि शौचालयाचा वापर केल्यानंतर साबणाने हात धुणे तसेच स्वच्छ अन्न आणि पाण्याचे सेवन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आणि दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले. आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व पात्र विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य, स्वच्छता आणि जंतांच्या संसर्गापासून बचाव करण्याबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

योग मित्र मंडळाचे रजत महोत्सवी योग संमेलन उत्साहात

योग विकण्याची नव्हे, तर शिकण्याची गोष्ट, मिलिंद वझलवार यांचे प्रतिपादन

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

योग मित्र मंडळ, उमरेडच्या रजत महोत्सवानिमित्त आयोजित योग संमेलन उत्साहात पार पडले. योग ही आरोग्याची चळवळ असून योगसाधकांनी ती निष्ठेने व्रत म्हणून स्वीकारावी. योग विकण्याची गोष्ट नसून शिकण्याची गोष्ट आहे. योग सातासमुद्रापार नेण्याचे कार्य परमपूज्य जनार्दन स्वामी यांनी केले असून, त्याच दिशेने योग मित्र मंडळ कार्य करीत आहे, असे प्रतिपादन योगाभ्यासी मंडळाचे कार्यवाह मिलिंद वझलवार यांनी संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी परमपूज्य जनार्दन स्वामी यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. मनीषा पांडे आणि अमिता अग्रवाल यांनी सादर केलेल्या योगगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. रजत महोत्सवाच्या पूर्वसंध्येला काढण्यात आलेल्या भव्य योग जनजागरण रॅलीने उत्सवाचे वातावरण निर्माण केले.

या एकदिवसीय संमेलनात विविध योगविषयक सत्रांचे आयोजन करण्यात आले. शाम



जनार्धनस्वामी योगाभ्यासी मंडळ, नागपूरचे कार्यवाह मिलिंद वझलवार मार्गदर्शन करतांना

देशपांडे यांनी योगवर्ग घेतला, तर अविनाश काळे यांनी शुद्धिक्रियांची प्रात्यक्षिके सादर केली. मिलिंद वझलवार यांनी अंतर्गत साधनेविषयी मार्गदर्शन केले. डॉ. अनिरुद्ध गुर्जलवार व शशांक भंडारी यांनी योगोपचार वर्ग घेतला. प्रणव पटवारी यांनी राष्ट्रभक्ती योग या विषयावर प्रवचन दिले. शाम देशपांडे व त्यांच्या चमूने भक्तिगीतांचे सादरीकरण केले. अरुणा हजारे, दीपिका जुमडे, मंगला व्यवहारे व सोनाली चंदनखेडे यांच्या समूहाने योगनृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

संमेलनाला आमदार संजय मेश्राम, माजी आमदार सुधीर पारवे, माजी आमदार राजू पारवे, नगराध्यक्षा प्राजक्ता कारू, माजी नगराध्यक्षा विजयलक्ष्मी भदोरिया, माजी नगराध्यक्ष गंगाधर रेवतकर, डॉ. शशिकांत जयस्वाल, दिलीप सोनटक्के, अनिल गोविंदानी, वसुधाताई खेते व सतीश चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. महेश जोशी यांच्या अध्यक्षतेखाली समारोपीय कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव राजकुमार पांडे यांनी केले. अरुणा भोंडे यांनी सूत्रसंचालन, तर संध्या गोतमारे यांनी आभार प्रदर्शन केले. विविध सत्रांचे सूत्रसंचालन गंगाधर काटवले, सुमित्रा हेडाऊ व विवेक सातेलवर यांनी केले. समारोपीय कार्यक्रमाचे आभार विनोद खोडे, मंगला व्यवहारे व कृष्णा हेडाऊ यांनी मानले.

या संमेलनासाठी जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळ, नागपूर, युथ फाउंडेशन उमरेड, महिला पतंजली योग समिती उमरेड, गुरुकुल अकॅडमी उमरेड, गोदरेज फोडबॅक फाउंडेशन, शालिनी गवळी व पूजा ब्रह्मे यांचे विशेष सहकार्य लाभले. संमेलन यशस्वी करण्यासाठी शरद व्यवहारे, गजानन ठाकरे, संजय मुळे, मुकुंदा नागपुरे, मनोहर तोडे, रामभाऊ तांबडे, नंदकिशोर बासोडे, रामविलास नेवारे, सतीश गुप्ता, ज्योती सारडा, संगीता मिश्रा, जया ठाकरे, शालिनी सोनटक्के, अर्चना सोनकुसरे, कल्पना सोनपुरे, अरुणा हजारे, रजनी कोल्हे, जयश्री तीनखेडे यांच्यासह अनेक योगसाधकांनी परिश्रम घेतले.

चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर, भिवापूरसह विविध भागांतील योगसाधकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रजत महोत्सवी संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

क्रांतिवीर श्यामलाल बाबू श्रीवास स्मृती संस्थाारे गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

क्रांतिवीर श्यामालाल बाबू श्रीवास स्मृती संस्था द्वारे सामाजिक बांधिलकी अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोडबोले चौक, श्रीवास नगर येथे गरजू विद्यार्थ्यांना व आर्थिक दृष्ट्या कमजोर २२ विद्यार्थ्यांना शालेय शूज आणि मोजे वितरण करण्यात आले, संस्थेच्या वतीने दरवर्षी विदयार्थ्यांना शैक्षणिक मदत केल्या जाते. यामध्ये गणवेश, स्कुल बॅग, शूज,पुस्तके इतर शैक्षणिक साहित्याचा समावेश आहे. हेमलतातार्इ सावजी, नगराध्यक्षा न. पं. महादुला यांच्या शुभहस्ते हे वितरण करण्यात आले यासोबतच आरोग्य विभाग उपक्रम अंतर्गत सर्व मुलांना जंतचे औषध सुद्धा देण्यात आले.

याप्रसंगी मुख्याध्यापिका सरोज वालदे, ज्योत्सना राऊत, नगरसेवक मोहसीन शेख, सचिन पाटील, नमिता गोडबोले, निकिता लोणारे, रंजना पखीड्डे, भारती वाघाडे, योगेश मेश्राम, राहुल लोणारे, निरंजन वालदे, अनिकेत वाणी, अश्विन डोंगरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक अमरजीत गोडबोले यांनी केले.

मनपाच्या एनडीएस पथकाकडून १३६ किलो प्लास्टिक जप्त

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मनपाच्या उपद्रव शोध पथकाने (एनडीएस) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (एमपीसीबी) सहकार्याने शहरातील विविध भागातील व्यापारी प्रतिष्ठानांवर छापे मारून १३६ किलो प्लास्टिक जप्त केले. तसेच अस्वच्छता पसरविणारे तसेच बांधकाम साहित्य रस्त्यावर ठेऊन वाहतुकीला अडथळा असणाऱ्या आणि कारवाई करून ९० हजार रुपयांचा दंड वसूल केला. राज्य सरकारने निर्बंध टाकलेल्या सिंगल यूज प्लास्टिकचा वापर करणाऱ्या व्यापाऱ्यांवर मनपाच्या एनडीएस पथकाने छापे मारले. मंगळवारी व धरमपेठ झोनमध्ये विविध व्यापारी प्रतिष्ठानांवर छापे मारून १३६ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. धरमपेठ झोनमध्ये रामनगरातील मे बाबा सेल्स दुकानातून निर्बंध घातलेले ३५ किलो सिंगल यूज प्लास्टिक जप्त करण्यात आले.

आयुर्कोशल्यम-२६'- कौशल्य उन्नयनविषयक आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

स्व. डॉ. श्रेयांश पचेरे यांच्या स्मृतीनिमित्त आयोजित 'आयुर्कोशल्यम -२६' ही कौशल्य उन्नयनविषयक आंतरराष्ट्रीय परिषद नुकतीच २४ ऑक्टोबर रोजी संपन्न झाली. ही परिषद आर.टी.एम. नागपूर विद्यापीठ परिसरातील गुरुनानक भवन येथे आयोजित करण्यात आली होती. 'नॅशनल असोसिएशन ऑफ व्हॅलियंट टीचर्स असोसिएशन ऑफ आयुष' आणि 'रोगनिदान विकृतीविज्ञान पीजी असोसिएशन, नागपूर' यांनी संयुक्तपणे या परिषदेचे आयोजन केले होते.

परिषदेच्या उद्घाटन समारंभास नागपूरचे महाराज श्रीमंत राजे मुधोजी भोसले हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

आर.टी.एम. नागपूर विद्यापीठाच्या 'आजीवन शिक्षण विभागा'चे संचालक समित महोरे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच, 'जी.ए.सी. माजी



विद्यार्थी संघटना, नागपूर'चे डॉ. संतोष धामेचा आणि 'जी.ए.सी.जळगावचे अधिष्ठाता डॉ. संतोष चव्हाण हे देखील या कार्यक्रमास उपस्थित होते. परिषदे दरम्यान, श्रीलंकेतील डॉ. कौशल्या कलवाना यांनी श्रीलंकेत उपलब्ध असलेल्या आयुर्वेदिक उपचार पद्धतींविषयी आपले विचार मांडले. या सत्राचे अध्यक्षपद डॉ.कल्पना जयस्वाल आणि डॉ.जयश्री अरोरा यांनी भूषवले. डॉ.अश्वत्थ राव (बंगळूरू) यांनी आयुवेर्दाद्वारे वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितींचे व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान दिले.

या सत्राचे अध्यक्षपद डॉ.वैशाली गणोरकर यांनी भूषवले. डॉ.रविशंकर परवाजे (मंगळूरू) यांनी आयुवेर्दाद्वारे तीव्र अर्धांगवायू (पॅरालिटिक स्ट्रोक) व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान दिले. या सत्राचे अध्यक्षपद डॉ. सुभाष वाघे आणि डॉ. विश्वनाथ काकडे यांनी भूषवले. डॉ.प्रथमेश कर्पे (गोवा) यांनी 'विद्ध कर्म' (पंचरिंग) द्वारे वैद्यकीय विकारांचे व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान दिले. या सत्राचे अध्यक्षपद डॉ. निलेश दळवी आणि डॉ. कार्तिकेयश्वरी अन्नेवार यांनी भूषवले. डॉ.अमोल बनसोडे (पुणे) यांनी 'अग्नि कर्म' (कॉटरायझेशन/दाहकर्म) द्वारे वैद्यकीय विकारांचे व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान दिले. या सत्राचे अध्यक्षपद डॉ. कविता अग्रवाल आणि डॉ. नदाकिशोर



उमळे यांनी भूषवले. डॉ. शिशिर प्रसाद (देहराडून) यांनी 'मर्म चिकित्सा' (महत्त्वाचा बिंदूंवर दाब देऊन उपचार करणे) द्वारे मज्जासंस्था आणि मणक्याशी संबंधित विकारांचे व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान दिले. या सत्राचे अध्यक्षपद डॉ. विनिता त्यागी आणि डॉ. भूषण रघुवंशी यांनी भूषवले.

उपस्थितांनी सर्व व्याख्यानांचे कौतुक केले. सर्व वक्त्यांनी विविध उपचार पद्धतींचा वापर करून यशस्वी रुग्ण व्यवस्थापनाची उदाहरणे सादर केली. परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुभाष वाघे यांनी सांगितले की, 'NAVTAPA' या नव्याने स्थापन झालेल्या संस्थेद्वारे आयोजित केलेली ही पहिलीच आंतरराष्ट्रीय परिषद आहे. आयुर्वेद डॉक्टरांचे क्लिनिकल कौशल्य अधिक विकसित करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता. देशभरातून सुमारे २०० प्रतिनिधींनी यात सहभाग घेतला. परिषदेच्या उद्घाटन समारंभात, आयोजन प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावल्याबद्दल डॉ. विनिता त्यागी (मुझफ्फरनगर), डॉ. कविता अग्रवाल (मथुरा) आणि डॉ. जयश्री अरोरा (बालाघाट) यांचा सत्कार करण्यात आला. या परिषदेच्या निमित्ताने एक 'प्री-कॉन्फरन्स' शोधनिबंध सादरीकरण स्पर्धाही आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये निवडक ९० शोधनिबंध ऑनलाइन सादर केले गेले.

परिषदेच्या उद्घाटन समारंभात, आयोजकांनी सर्वोत्तम शोधनिबंध, सर्वोत्तम पोस्टर आणि सर्वोत्तम मॉडेल या श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान केले. 'सर्वोत्तम शोधनिबंध' श्रेणीत डॉ.जयेश चालिसगावकर (सँम आयुर्वेदिक कॉलेज, भोपाळ) आणि डॉ. ओम विराडिया (पारुल इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद, वडोदरा, गुजरात) यांनी प्रथम पारितोषिक पटकावले. 'सर्वोत्तम मॉडेल' श्रेणीत डॉ. मानवा मेहता (पारुल इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद, वडोदरा, गुजरात) यांनी प्रथम पारितोषिक मिळवले. परिषदेच्या यशासाठी डॉ.अविनाश राडके, डॉ. अभिनंदन मुके, डॉ.तृप्ती यवतकर, डॉ.भाग्य रंजन डेंश, डॉ.हेमंत पांचाडे, डॉ.अंकुश डिकोंडवार, डॉ. दर्शना उभाळे, डॉ.स्नेहल राणे, डॉ.अमोल गुजराथी, डॉ. राजेश साव आणि डॉ. भार्गव ठाकोर यांनी विशेष परिश्रम घेतले.

थोडक्यात

रब्बी हंगामात पिकांचे व पाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

यंदाच्या पर्जन्यमानातील घट आणि अल-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश व पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर, रब्बी हंगामातील पिक नियोजन करताना शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर करावा तसेच उपलब्ध पाण्याचा साठा, जमिनीचा प्रकार आणि स्थानिक हवामानाचा विचार करूनच पिकांची पेरणी करावी, असे आवाहन नागपूरच्या तालुका कृषी अधिकारी श्रीमती रमा बनकर यांनी केले आहे. रब्बी हंगामात पिकांची निवड करताना शेतकऱ्यांनी कमी पाण्यात येणाऱ्या तसेच कमी कालावधीच्या पिकांना प्राधान्य द्यावे. गहू पिकाला अधिक पाण्याची गरज असून यांसारख्या पिकांचे क्षेत्र उपलब्ध पाण्यानुसारच निश्चित करावे. हरभरा, करडई, जवस, तीळ, ज्वारी, बाजरी, मका व सूर्यफूल यांसारख्या कमी पाण्यात घेता येणाऱ्या पिकांचा विचार करावा. चिया आणि जनावरांसाठी चारा पिकांचे नियोजन करताना कृषी विभागाचे मार्गदर्शन घ्यावे.

पाणी सिंचनासाठी शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी

पेरणीपूर्वी शेतातील उपलब्ध ओलावा व बोअरवेलमधील पाणीसाठा तसेच सिंचनासाठी उपलब्ध पाण्याचे योग्य मूल्यमापन करावे. उपलब्ध पाण्याच्या प्रमाणानुसार पेरणीखालील क्षेत्र निश्चित करावे. मोठ्या क्षेत्रावर जास्त पाणी लागणारी पिके घेणे टाळावे. हरभरा, करडई, जवस या कमी पाण्याच्या पिकांना प्राधान्य द्यावे. संत्रा पिकामध्ये आच्छादनाचा वापर करावा. ठिबक सिंचन, तुषार सिंचन आणि इतर सूक्ष्म सिंचन पद्धतीचा शक्य तिथे वापर करावा. जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आंतरमशागत, कोळपणी व तणनियंत्रण यांसारखा उपाययोजना कराव्यात.

रब्बी ज्वारीबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

विदर्भामध्ये रब्बी हंगामात ज्वारी हे अत्यंत महत्त्वाचे पीक असून, यामुळे अन्नधान्यावरोबरच जनावरांसाठी अत्यंत पौष्टिक सुका कडबा (चारा) मिळतो. विदर्भासाठी शिफारस केलेले प्रमुख वाण पिकेव्ही क्रांती, ताकपा-५, ट्रॉबे अकोला सुरुची, फुले सुचित्रा, मालदांडी ३५-१ आणि परभणी शक्ती हे आहेत. रब्बी ज्वारीच्या बियाण्यासाठी शेतकऱ्यांनी 'महाडीबीटी' पोर्टलवर अर्ज सादर करावे. हवामानातील बदल आणि संभाव्य पाणीटंचाईचा विचार करून आर्थिक जोखीम कमी करणारे पिकांचे नियोजन करावे व कृषी विभागाचे मार्गदर्शन घेण्याचे आवाहन नागपूरच्या तालुका कृषी अधिकारी श्रीमती बनकर यांनी केले आहे.

आसोलीत शॉर्टसर्किटने घराला आग, अंदाजे तीन लाखांचे नुकसान

संसारोपयोगी साहित्य जळून खाक, पीडित कुटुंबाला आर्थिक मदतीची प्रतीक्षा



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक तालुक्यातील आसोली येथे शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत एका गरीब कुटुंबाचे मोठे नुकसान झाले. या घटनेत घरातील जीवनावश्यक व संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले असून, अंदाजे तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे पीडित कुटुंबाने सांगितले. या संकटातून सावरण्यासाठी कुटुंबाला प्रशासनाकडून आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आसोली येथील रहिवासी रवींद्र सुरेश हटवार यांच्या घराला सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. आगीने काही वेळातच घरातील साहित्याला कवेत घेतल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. या आगीत घरातील आवश्यक वस्तूंचे नुकसान झाल्याने हटवार कुटुंबासमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. आधीच आर्थिक परिस्थितीशी झुंज देणाऱ्या या कुटुंबाला आता संसार पुन्हा उभा करण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच ग्राम महसूल अधिकारी कांचन देशमुख यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीचा पंचनामा केला. पंचनाम्याचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदारांकडे पाठविण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. प्रशासनाने नुकसानीची दखल घेऊन पीडित कुटुंबाला लवकरात लवकर आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

माळेगाव जवळ वाहनाचा अपघात; एक जखमी, चार जण सुरक्षित

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील माळेगावजवळील निमाणीधिन उड्डाणपूला जवळ सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास वाहनाचा अपघात झाला. छत्तीसगडमधील रायपूर येथून उज्जैनकडे जात असलेल्या CG-04-PS-2111 क्रमांकाच्या वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची माहिती आहे. या अपघातात रायपूर येथील अंकित पांडे (वय ३५) यांच्या हाताला दुखापत झाली. त्यांच्यासोबत प्रवास करणारे अन्य चार मित्र सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी अंकित पांडे यांना बनसोड यांच्या रुग्णवाहिकेतून पुढील उपचारासाठी नागपूर येथे रवाना करण्यात आले. अपघाताचे नेमके कारण आणि जखमींच्या प्रकृतीबाबत अधिकृत माहिती अद्याप उपलब्ध नाही.



कविवर्य उ. रा. गिरी स्मृती कविसंमेलनात कवितांचा बहारदार आविष्कार

विविध विषयांवरील कवितांनी रसिकांची जिंकली मने

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भ साहित्य संघ आणि आर. एस. मुंडले कला, वाणिज्य महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी धरमपेठ येथील आर. एस. मुंडले महाविद्यालयात 'कविवर्य उ. रा. गिरी स्मृती' कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या कविसंमेलनात विविध विषयांवरील कवितांचे सादरीकरण करत कवींनी रसिकांना साहित्यिक मेजवानी दिली.

कार्यक्रमाला विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष बाळ कुलकर्णी, अरुणा सबाने, विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस विलास मानेकर, प्रा. विनोद जिवनतारे, आणि आर. एस. मुंडले महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मंजुश्री सरदेशपांडे उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.



कविसंमेलनात डॉ. श्यामल सराडकर यांनी 'कोणते मी नाव देऊ' ही कविता सादर केली. प्रसन्न शेंबेकर यांनी 'मनाच्या मर्मबंधाचा' ही गझल सादर केली. कविता आणि संगीत ही भावना व्यक्त करण्याची प्रभावी माध्यमे असून, ती एकमेकांपासून वेगळी नसल्याचा भाव त्यांच्या सादरीकरणातून व्यक्त झाला. चित्रा कहाते यांनी 'सभेत चालण्याची फुले वेचतांना' ही कविता सादर केली, तर प्रा. अशोक काळे यांनी 'झाड आणि वृक्ष' या कवितेतून माणसातील अहंकार, संकुचित वृत्ती आणि स्वार्थीपणावर भाष्य केले. माणूस स्वतःच्याच कोषात अडकून केवळ वस्तू





जमवण्यात मग्न होतो, हा आशय या कवितेतून व्यक्त झाला. वर्षा थोटे यांनी स्त्रियांच्या जीवनातील परिस्थितीवर भाष्य करणारी 'माफक इच्छा' ही कविता सादर केली. वृंदा जोगळेकर यांनी 'पाऊस होणं' या कवितेतून निसर्गाशी एकरूप होण्याची भावना, मानवी मनातील विविध भावभावना आणि बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. सुनंदा जुलमे यांनी 'कितीही दिवसांनी पुन्हा' या कवितेतून दोन बहिणींमध्ये वाद झाल्यानंतरही कायम राहणाऱ्या प्रेमाचे भावपूर्ण चित्रण केले. प्रा. विनोद जिवनतारे यांनी 'तो माझा बाप होता' या कवितेतून वडिलांविषयीच्या भावना व्यक्त केल्या.

याशिवाय विजय राठोड, माया रंभाळे-परते, राजू रामचंद्र डहाके, रमेश बेलगे, सुहास काकडे, शितल बोंडे, विद्या डोनटकर, प्रकाश गोंडे, स्मिता काळीकर, विजय वा साडे, चंद्रकांत वझलवार, विद्या निनावे, देवमन कामडी, हितेश गोमासे, राहुल गवस, वैशाली धनविजय, प्रज्ञा निनावे, ज्योत्स्ना दोनाडकर आणि गोपाल मापारी आदी कवींनी आपल्या कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती देशपांडे यांनी केले. प्रा. विनोद जिवनतारे यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. शुभदा फडणवीस यांनी प्रास्ताविक केले, तर प्रा. राऊत यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

ग्रामीण शिक्षणाचा नवा आदर्श! कहालीच्या हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळेची हॅकेथॉनमध्ये दमदार कामगिरी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळतेय नवी दिशा, शिक्षकांच्या समर्पित प्रयत्नांतून शाळेची आदर्श वाटचाल

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

इच्छा तिथे मार्ग आणि ध्येय निश्चित असेल, तर कोणतीही गोष्ट अशक्य नसते, या उक्तीचा प्रत्यय सालेकसा तालुक्यातील कहाली येथील जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळेच्या वाटचालीतून येत आहे. सरकारी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबाबत सकारात्मक चित्र उभे करणाऱ्या या शाळेने विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शिक्षकांचे समर्पण, विद्यार्थ्यांची जिज्ञासा आणि नावीन्यपूर्ण शिक्षणपद्धती यांमुळे ही शाळा इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

हॅकेथॉन उपक्रमात विद्यार्थ्यांची कल्पकता उजळली

नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या हॅकेथॉन उपक्रमात कहाली येथील जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ग्रामीण भागातील



विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा, बुद्धिमत्तेचा आणि सर्जनशीलतेचा उपयोग करून विविध नावीन्यपूर्ण प्रकल्प तयार केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्यांना वाव मिळण्याबरोबरच त्यांच्यात समस्या सोडविण्याची क्षमता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नव्या गोष्टी शिकण्याची जिज्ञासा विकसित होत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही आधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्याची आणि नावीन्यपूर्ण कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची क्षमता आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे. योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठी कामगिरी करू शकतात, असा विश्वास या विद्यार्थ्यांचा प्रवक्तृत्व व्यक्त होत आहे.

समर्पित शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थ्यांची यशस्वी सांगड

या शाळेच्या प्रगतीमागे शिक्षकांचे परिश्रम, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याची वृत्ती आणि शिक्षणाप्रती असलेली बांधिलकी महत्त्वाची ठरत आहे. केवळ पाठ्यपुस्तकांपुरते शिक्षण मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वतःच्या कल्पना मांडण्याची, प्रयोग करण्याची आणि नव्या गोष्टी आत्मसात करण्याची संधी मिळत आहे.

शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होत असून, त्यांच्या सुप्त गुणांना चालना मिळत आहे. यापुढेही या शाळेतील विद्यार्थ्यांचे कौशल्य आणि शिक्षकांचा मेहनतीचे विविध स्तरांतून कौतुक झाले आहे.

ग्रामीण सरकारी शाळाच घडविणार उद्याचे भविष्य!

आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील सरकारी शाळांनीही आधुनिक शिक्षणपद्धती, तंत्रज्ञानाधारित उपक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापनाचा स्वीकार करणे गरजेचे आहे. कहाली येथील हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळेची वाटचाल याच दिशेने टाकलेले एक सकारात्मक पाऊल आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दजेदार शिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि स्वतःची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिल्यास ते कोणत्याही क्षेत्रात मागे राहणार नाहीत. सरकारी शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थी एकत्रितपणे प्रयत्नशील राहिल्यास ग्रामीण शिक्षण व्यवस्थेत निश्चितच सकारात्मक बदल घडू शकतो.

कहाली येथील या शाळेने हॅकेथॉनसारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळवून दिलेली चालना कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांची मेहनत आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा हा संगम ग्रामीण शिक्षणाच्या उज्ज्वल भविष्याची आशा निर्माण करणारा असून, शाळेच्या या उपक्रमाचे परिसरातून अभिनंदन होत आहे.

दहा वर्षे अंगणवाड्यांचा अंधार कायम!

नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह, वीजजोडणी सुरू करण्यासाठी महिला व बालकल्याण सभापतींचे साकडे

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

एकीकडे बालकांच्या सर्वांगीण विकासाच्या घोषणा आणि दुसरीकडे अंगणवाड्यांमध्ये वीजजोडणीच नाही! भिवापूर नगरपंचायत हद्दीतील अंगणवाड्यांचा हा प्रश्न तब्बल दहा वर्षांपासून प्रलंबित असल्याचा मुद्दा पुढे आला आहे. लहान बालकांचे पूर्वप्राथमिक शिक्षण, पोषण आहाराचे व्यवस्थापन आणि दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेल्या विजेअभावी अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि बालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

नगरपंचायतीच्या महिला व बालकल्याण सभापती रीना खापरीकर यांनी आज या प्रश्नावर मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने वीजजोडणी सुरू करण्याची मागणी केली आहे. अंगणवाड्यांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी आणि कार्यवाहीचा अहवाल लेखी द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

बालकांच्या सुविधांकडे दुर्लक्ष किती दिवस?

अंगणवाडी ही केवळ पोषण आहार वाटपाची जागा नसून बालकांच्या शिक्षणाचा आणि विकासाचा पाया आहे. अशा महत्त्वाच्या केंद्रांमध्ये वीजजोडणी उपलब्ध नसल्यास मूलभूत सुविधांच्या नियोजनावरच प्रश्न उपस्थित होतात. बालकांच्या सुविधांसाठी निधी, योजना आणि घोषणांची चर्चा होत असताना प्रत्यक्षात वीजेसारखी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास विलंब का, असा सवाल उपस्थित होत आहे. रीना खापरीकर यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे निर्देश देण्याची मागणी केली आहे. आता नगरपंचायत प्रशासन या प्रश्नावर किती तत्परतेने पावले उचलते आणि अंगणवाड्यांमधील अंधार कधी दूर होतो, याकडे लक्ष लागले आहे. अंगणवाड्यांचा वीज पुरवठा पूर्ववत करणार, अशी माहिती अभियंता मयूर वनरासे यांनी दिली. वेत्या आठ ते दहा दिवसात नगरपंचायततर्फे विजेचे थकीत बिल भरून अंगणवाड्यांचा विद्युत पुरवठा पूर्ववत सुरु करणार आहे.

रोशनलाल मोहरीलाल लिल्हारे यांना राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित!

शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल, गोंदिया जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा!

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य, कर्तव्यनिष्ठा, समर्पण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाप्रती असलेली बांधिलकी यासाठी रोशनलाल मोहरीलाल लिल्हारे यांना राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बी दि चेंज फाउंडेशन, शिर्डी (जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र) यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या गौरवपूर्ण यशामुळे गोंदिया जिल्ह्याच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या कार्यक्रमात विशाल शेंडे साहेब, सहायक आयुक्त, धमार्दाय विभाग, अहिल्यानगर, महाराष्ट्र यांच्या शुभहस्ते लिल्हारे यांचा सन्मान करण्यात आला.



यावेळी अभिनेत्री निवेदिता पगार, त्रिदल सैनिक संघ, नाशिकच्या कार्याध्यक्षा करुण भंडारे, विश्वकप इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक बाबासाहेब कापे, पंजाब नॅशनल बँकेचे व्यवस्थापक निलेश घोडेचोर तसेच फाउंडेशनचे अध्यक्ष मयूर ढोकचौळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी लिल्हारे यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, विशेष वस्त्र आणि साईबाबांची मूर्ती प्रदान करून गौरविण्यात आले.

शिक्षणाप्रती समर्पण आणि आदर्श नेतृत्वाची ओळख

रोशनलाल मोहरीलाल लिल्हारे हे सध्या उच्च श्रेणी मुख्याध्यापक, पीएम श्री जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक आदर्श केंद्र पाठशाळा, झालिया, जिल्हा गोंदिया या पदावर कार्यरत आहेत. शाळेतील शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा घडवून आणणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, शैक्षणिक उपक्रमांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करणे तसेच शाळेत सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

त्यांचे समर्पित कार्य, शिस्तप्रियता, कर्तव्यनिष्ठा आणि नेतृत्वक्षमता लक्षात घेऊन त्यांना या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा सन्मान केवळ लिल्हारे यांच्या वैयक्तिक परिश्रमांचा आणि शैक्षणिक योगदानाचा गौरव नसून, झालिया येथील शाळा, शिक्षकवर्ग आणि संपूर्ण गोंदिया जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

सामाजिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान

शैक्षणिक कार्यासोबतच रोशनलाल लिल्हारे हे सामाजिक आणि संघटनात्मक कार्यातही सक्रिय भूमिका बजावत आहेत. ते पुढील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडत आहेत, असे संयोजक अखिल भारतीय लोधी, लोधा, लोध अधिकारी-कर्मचारी संघ (आलोक), महाराष्ट्र प्रदेश. व उपाध्यक्ष, लोधी समाज, गोंदिया, उपाध्यक्ष लोधी समाज सेवा समिती, आमगाव यांनी सांगितले. शिक्षण आणि सामाजिक संघटनांच्या माध्यमातून ते समाजात शैक्षणिक जागरूकता, सामाजिक एकोपा आणि सकारात्मक परिवर्तनाची भावना वृद्धिंगत करण्यासाठी योगदान देत आहेत. रोशनलाल मोहरीलाल लिल्हारे यांना राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल राष्ट्रीय आलोक संघ, आलोक महाराष्ट्र प्रदेश, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ आणि महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

याशिवाय झालिया केंद्राचे केंद्रप्रमुख ए. एम. घावळे, पीएम श्री जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक आदर्श पाठशाळा, झालिया येथील शिक्षकवृंद, झालिया केंद्रातील सर्व शिक्षक, झालिया येथील सरपंच कुंजन नवगोडे, उपसरपंच ललितजी मच्छिरके, पोषण आहार पर्यवेक्षिका कविता कुराहे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा भूमेश्वरी लांजेवार, उपाध्यक्ष विनोद राहंगडाले आणि समितीच्या सदस्यांनीही त्यांचे अभिनंदन केले.

तसेच लोधी समाज सेवा समिती, आमगाव, लोधी समाज, गोंदिया, लोधी मिलन समारोह समिती, गोंदिया आणि पंचायत समिती सालेकसा अंतर्गत कार्यरत अनेक शिक्षक व मान्यवर नागरिकांनी श्री. लिल्हारे यांच्या या यशाबद्दल आनंद व्यक्त करून त्यांचा गौरव केला.

रोशनलाल मोहरीलाल लिल्हारे यांना प्राप्त झालेला हा पुरस्कार त्यांच्या मेहनतीचा, निष्ठेचा, शैक्षणिक उत्कृष्टतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा गौरव आहे. त्यांच्या या यशामुळे इतर शिक्षकांनाही शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे आणि विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याची प्रेरणा मिळणार आहे.गोंदिया जिल्ह्यासाठी हा अभिमानाचा क्षण असून, लिल्हारे यांच्या यशामुळे झालिया शाळेच्या आणि शिक्षक समुदायाच्या नावलौकिकात भर पडली आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस सर्व शुभचिंतकांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या

थोडक्यात

भन्साळी टाकळी येथे कार-दुचाकीची धडक, हितज्योती आधार फाउंडेशनची टीम मदतीसाठी दाखल

सावनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना, जखमी दुचाकीस्वार रुग्णालयात दाखल



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भन्साळी टाकळी येथे मंगळवारी सकाळी सुमारे १०.३० वाजता कार आणि दुचाकी यांच्यात अपघात झाला. या घटनेत विवेक राऊत (रा. कोदेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर) हे जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विवेक राऊत हे आपल्या एमएच ४० डीजे ०२७० क्रमांकाच्या दुचाकीने टाकळी येथे आजोबांना आणण्यासाठी जात होते. दरम्यान, एमपी २८ सीबी १०४७ क्रमांकाच्या कारची त्यांच्या दुचाकीला धडक बसली. या अपघातात दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर हितेश बनसोड यांच्या हितज्योती आधार फाउंडेशनची टीम घटनास्थळी दाखल झाली. टीमने अपघातग्रस्ताला मदत करण्यासाठी पुढाकार घेतला. जखमी विवेक राऊत यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

गुणवत्ता म्हणजे उत्कृष्टतेच्या शोधाचा प्रवास : डॉ. वेदप्रकाश मिश्रा

क्यूसीएफआयच्या 'एक्सलन्स अकॅडमी'चे थाटात उद्घाटन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

गुणवत्ता ही केवळ एक संकल्पना नसून ती उत्कृष्टतेच्या दिशेने सुरू असलेला अखंड प्रवास आहे. गुणवत्ता ही केवळ दृष्टिकोनातून साध्य होत नाही, तर त्यासाठी सक्षम नेतृत्वाचीही आवश्यकता असते, असे प्रतिपादन दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचे प्रो-चॅन्सेलर डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी केले. क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया (क्यूसीएफआय), नागपूर चॅप्टरच्या 'एक्सलन्स अकॅडमी'चे उद्घाटन डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. क्यूसीएफआय, नागपूर चॅप्टर आणि रामदेवबाबा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी रामदेवबाबा विद्यापीठात ३७व्या चॅप्टर कन्व्हेन्शन ऑन क्वालिटी कॉन्सेप्ट्स (सीसीक्यूसी-२०२६)चे आयोजन करण्यात आले होते. डॉ. मिश्रा यांनी गुणवत्ता आणि नेतृत्व यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करताना सांगितले की, उत्कृष्टतेच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी केवळ दूरदृष्टी पुरेशी नसते. त्या दृष्टिकोनाला प्रत्यक्षात आणण्यासाठी सक्षम नेतृत्व, योग्य दिशा आणि कृतीशीलता आवश्यक असते.

यावेळी क्यूसीएफआय नागपूर चे सल्लागार अजय निगम यांना डॉ. मिश्रा यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच, दिनेश कनोजे देहाती-, गणेश भाकरे यांचा सत्कार करण्यात आला. विविध स्पर्धांचे परीक्षकांचा सत्कार करण्यात आला. तसेच निबंध, कविता, घोषवाक्य आणि पोस्टर स्पर्धांमधील विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला केइसी इंटरनॅशनलचे (आय ओ) वरिष्ठ उपाध्यक्ष देवेंद्र पटोदी, मराठवाहाड मिल्क प्रोड्युसर चे चीफ एक्जिक्यूटिव आती आणि डायरेक्टर डॉ शिव कुमार पाटील क्यूसीएफआयचे अध्यक्ष अविनाश मिश्रा, संचालक अविनाश उपाध्याय, कार्यकारी संचालक डी. के. श्रीवास्तव, क्यूसीएफआय नागपूर चॅप्टरचे चेअरमन विवेक श्रौती, चेअरमन एमेरिटस ए. के. जैन आणि नागपूर चॅप्टरचे सचिव विवेक जोशी उपस्थित होते. यावेळी अविनाश उपाध्याय, डीके श्रीवास्तव यांनी मनोगत व्यक्त करत विजेत्यांना शुभेच्छा दिल्या. संजय कुळकर्णी यांनी आभार मानले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सव में प्राचार्य डॉ. शुभांगी लुंगे इनका सन्मान

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

श्रीक्षेत्र गुरुकुंज मोझरी आश्रम मे आयोजित विशाल महिला संमेलन मे संमेलनाध्यक्ष पुष्पाताई बोंडे अध्यक्ष, संचालक मंडळ



और प्रा. डॉ. विजयालक्ष्मी थोटे,अध्यासन विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ इनके करकमलोद्वारा तथा आरतीताई वानखेडे, वैशालीताई सोनवणे, गौरीताई देशमुख, पौर्णिमाताई सवाई, शितलताई डोंगरे, शुभांगीताई वानखेडे, सदस्या-अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ और महानगर नागपुरके डॉ. मीनल खोंडे, स्नेहलता घोगरे एवं सौदामिनी लुंगे इनकी प्रमुख उपस्थिती मे आठवले समाजकार्य महाविद्यालय, चिमुरकी प्राचार्य डॉ. शुभांगी योगेश लुंगे इनका शाल, श्रीफळ, पुष्पहार और ग्रामगीता ग्रंथ देकर, वंदनीय राष्ट्रसंतजीके साहित्यपर "आचार्य"पदवी प्राप्त करनेहेतू सन्मान किया गया है ! श्रीगुरुदेव परिवार और मित्रपरिवार नागपूर की ओर से प्राचार्य डॉ. शुभांगी लुंगे इनका हार्दिक अभिनंदन किया जा रहा है !

आता स्थानिक समस्यासाठी डिफेन्स क्षेत्रात आंदोलनाची पाळी

लाल झेंडा कामगार संघटनेचे साखळी आंदोलन



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

सुरक्षित व सुविधा जनक समजल्या जाणाऱ्या डिफेन्स परिसरातही आता नागरिक समस्यांनी कर्मचारी व त्यांचे परिवार त्रस्त झाल्या ने कामगार संघटनांना आता चांगले रस्ते व शुद्ध पाण्या साठी स्थानिक समस्येसाठी ही आंदोलन करावे लागत असल्याचे दिसून येत आहे.

ऑर्डनन्स फॅक्टरी अंबाझरीच्या वसाहतीमधील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था तसेच रहिवाशांना होत असलेला दूषित पाणीपुरवठा याबाबत ऑर्डनन्स एम्प्लॉईज युनियनने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या समस्यांमुळे कारखान्यातील कर्मचारी, त्यांचे कुटुंबीय, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

वसाहतीतील रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून वाहनचालकांना तसेच पादचाऱ्यांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वार, शाळकरी मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर होते.तसेच वसाहतीमध्ये दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा तक्रारींमुळे नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंतेचे वातावरण आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी असून, याकडे दुर्लक्ष करणे कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याशी खेळण्यासारखे आहे. मूलभूत सुविधा देण्यासही यंत्र इंडिया लिमिटेड प्रशासन अपयशी ठरत आहे. ऑर्डनन्स एम्प्लॉईज युनियनच्या वतीने प्रशासनाकडे वसाहतीतील सर्व खराब रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून नवीन रस्त्यांचे बांधकाम करण्यात यावे.

दूषित पाणीपुरवठ्याची तातडीने चौकशी करून पाण्याची गुणवत्ता तपासण्यात यावी. वसाहतीतील सर्व रहिवाशांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी नियमितपणे उपलब्ध करून देण्यात यावे.

रस्ते व पाणीपुरवठ्याच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करून संबंधित कामांसाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करण्यात यावी,कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे.

युनियनच्यावतीने प्रशासनाला आवाहन करण्यात येते की, या गंभीर समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक कार्यवाही करावी. कर्मचाऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरणात राहण्याचा अधिकार आहे. प्रशासनाने या मागण्यांची त्वरित दखल न घेतल्यास युनियनच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात आलेले आहे.

२६ सप्टेंबरला गेट नंबर तीन समोर आंदोलन केले २७ तारखेला गेट नंबर तीन समोर निदर्शनांदोलन २८ ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी खराब रस्त्याचे विरोधात आंदोलन २० सप्टेंबरला कार्यकारी निर्देशक हा एक निर्माण देण्यात येईल ३० ऑक्टोबरला मुख्य प्रबंधक व निदेशक यंत्र इंडिया ला निवेदन देण्यात येईल अशी माहिती वाडी पत्रकार परिषदेत ऑर्डनन्स एम्प्लॉईज युनियन अंबाझरी चे पदाधिकारी आशिष पाचघरे विनोद कुमार,अनंत भारसाकळे, अवनिष कुमार मिश्रा, खुर्शीद अली पठाण, सुनील मंडाले व पदाधिकाऱ्यांनी दिली.

नागपूर महानगरपालिकेतर्फे राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा

वाल्मिकी हिंदी माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप, जंतसंसर्ग प्रतिबंधाबाबत जनजागृती





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त आज गांधीनगर येथील वाल्मिकी हिंदी माध्यमिक शाळेत जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. यावेळी शाळेतील मुला-मुलींना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करून जंतसंसर्ग प्रतिबंधाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या अनुषंगाने १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळ्या देण्याच्या उपक्रमाची माहिती देण्यात आली. जंतसंसर्गामुळे बालकांमध्ये कुपोषण व रक्तक्षय होण्याचा धोका असतो. तसेच यामुळे मुलांच्या शारीरिक वाढीवर, मानसिक विकासावर आणि शैक्षणिक प्रगतीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मुलांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी जंतसंसर्ग प्रतिबंधाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

राष्ट्रीय जंतनाशक दिन हा बालकांचे आरोग्य, पोषणस्थिती आणि सर्वांगीण विकास सुधारण्याच्या उद्देशाने राबविण्यात येतो. या उपक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये जंतनाशक दिन साजरा करण्यात आला.तसेच वढलर द्वारे शाळेला गोळ्यां पुरविण्यात आल्या. शाळा व अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून १ ते १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना जंतनाशक गोळ्या निःशुल्क दिल्या जातात. नोंदणी न झालेल्या तसेच शाळेबाहेरील मुला-मुलींनाही अंगणवाडी स्तरावर गोळ्या देण्याची व्यवस्था करण्यात येते. हा उपक्रम महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित, मुरुगानंथम एम. यांच्या देखरेखीत आयोजित करण्यात आला.

यावेळी मुंबईचे उपसंचालक डॉ. सचिन तडस यांनी विद्यार्थ्यांना जंतसंसर्ग प्रतिबंधाचे महत्त्व सांगितले. नागपूर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी अल्बेंडाझोल या जंतनाशक गोळीचे महत्त्व आणि बालकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यातील तिची भूमिका याबाबत माहिती दिली तसेच जंतसंसर्गामुळे मुलांच्या शारीरिक वाढीवर, मानसिक विकासावर आणि शैक्षणिक प्रगतीवर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत मार्गदर्शन केले.

ज्या मुला-मुलींना २७ ऑक्टोबर २०२६ रोजी जंतनाशक गोळी मिळाली नसेल, त्यांच्यासाठी ३ नोव्हेंबर २०२६ रोजी मॉप-अप दिन आयोजित करण्यात आला आहे. या दिवशी संबंधित मुलांना जंतनाशक गोळी देण्याबाबत पालकांनी जागरूक राहावे असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाला उपसंचालक डॉ. सचिन तडस, नागपूर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, शिक्षणाधिकारी अमित भदाणे,जिल्हा परिषद नागपूरचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत, मनपाचे माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. सरला लाड, जिल्हा परिषद चे जिल्हा माता व बाळ सांगोपण अधिकारी डॉ. रेवती साबळे, वाल्मिकी हिंदी माध्यमिक शाळेची मुख्याध्यापिका डॉ. वंदना महाजन, जिल्हा ग्रामीण रुग्णालयचे डॉ. वानखेडे, झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा देवस्थळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. विभूती पानबुडे, पी.एच.एन अर्चना खाडे, ज्योती मानकर, प्रफुल्ल किन्हीकर, संवाद तज्ज्ञ स्नेहल करंजेकर तसेच वाल्मिकी हिंदी माध्यमिक शाळेचे शिक्षिका, तेलंगखेडी दवाखाना परिचारिका व आशा तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

वाडी पोलिसांची अवैध दारूविक्रीविरोधात कारवाई, ९ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

गुप्त माहितीच्या आधारे वाडी पोलिसांनी अवैध दारूविक्रीविरोधात कारवाई करत ९ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई वाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. या प्रकरणी निर्भय अशोक डोंगरे (वय २१, रा. दवलामेटी) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस उपनिरीक्षक उत्तम जायभाय यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने पंचांच्या उपस्थितीत आरोपीच्या राहत्या घराच्या आवारात कारवाई केली. यावेळी देशी दारू संत्रा नंबर वन भिंगरीचा ११८ सीलबंद प्लास्टिक बाटल्या, प्रत्येकी ८० रुपये किमतीच्या, असा एकूण ९ हजार ४४० रुपयांचा दारूसाठा तसेच ३०० रुपये किमतीची पाण्याची कॅन असा एकूण ९ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक उत्तम जायभाय यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार नागेश दासरवार, विजय वायदुडे, राहुल नागदेवे, चंद्रकुमार टेकाम आणि पोलीस अंमलदार दिलीप बाजड यांच्या पथकाने केली. याप्रकरणी वाडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सार्वजनिक वाचनालय महिला समाज सावनेर येथे पाच दिवसीय शारदा उत्सव उत्साहात



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सार्वजनिक वाचनालय म. स. सा. ग्रंथालयात दिनांक २१ ऑक्टोंबर ते २५ ऑक्टोबर दरम्यान पाच दिवसीय शारदा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. उत्सवाच्या अध्यक्षा डॉ. ज्योत्सना थोटे होत्या. प्रमुख पाहुणा मायाताई मंगळे यांनी शारदा मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलाने उत्साहाची सुरुवात केली. पाच दिवसात विविध रंगारंग कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये कॅटवॉक, सुरमय संगीत, खेळ, बॉलीवूड डान्सिंग, रंगा रंगीला राजस्थान तसेच गरबा या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन डॉ. अश्विनीताई पोफळी आणि सौ.सविताताई आठवले यांनी केले. या कार्यक्रमात अनेक भगिनींनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच कार्यक्रमाला भरपूर महिलांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचा शेवट अध्यक्षा डॉ. ज्योत्सना ताई धोटे यांच्या आभार प्रदर्शनाने करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्देश फक्त मनोरंजन नसून सामाजिक प्रबोधन सुद्धा होते, जेणेकरून जास्तीत जास्त जणांचा कल पडद्याआड होत असणाऱ्या ग्रंथालयाकडे वाढेल.

कोंढाळी येथे सत्यशोधक सामान्य ज्ञान व निबंध स्पर्धा उत्साहात

महात्मा फुले द्विशताब्दी जयंतीनिमित्त उपक्रम, तीन केंद्रांवर ३२२ विद्यार्थ्यांचा सहभाग





दै. सिंहवाणी वृत्त, कोंढाळी

संत सावता माळी संस्था, कोंढाळी तर्फे महात्मा फुले द्विशताब्दी जयंतीनिमित्त सत्यशोधक सामान्य ज्ञान स्पर्धा व सत्यशोधक निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सामान्य ज्ञान स्पर्धेचा विषय क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवनचरित्र, कार्य व शासकीय योजना यांवर आधारित होता. निबंध स्पर्धेसाठी महात्मा फुले : समतेच्या समाजनिर्मितीचे द्रष्टे विचारवंत, महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या शिक्षणव्यवस्थेतील उपयुक्तता, सत्यशोधक विचार आणि आजचा समाज : महात्मा फुले यांच्या विचारांचे समकालीन महत्त्व, असे तीन विषय देण्यात आले होते. निबंधासाठी ५०० शब्दांची मर्यादा ठेवण्यात आली होती.

स्पर्धेतील प्रथम पारितोषिक तीन हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, ग्रंथ व प्रमाणपत्र असे आहे. द्वितीय पारितोषिक २००० रुपये, तर तृतीय पारितोषिक १००० रुपये आहे. याशिवाय दोन प्रोत्साहनपर पारितोषिके व पाच उत्तेजनार्थ पारितोषिके सन्मानचिन्ह, ग्रंथ व प्रमाणपत्र स्वरूपात देण्यात येणार आहेत. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यालां संस्थेतर्फे प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

स्पर्धा संयोजक दर्शना बोडखे यांनी सांगितले की, या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांचा वाचनाकडे कल वाढेल आणि त्यांना पुस्तकांचे महत्त्व कळेल, या अपेक्षेनेच हा उपक्रम राबविण्यात आला. परीक्षेला एकूण ३२२ विद्यार्थी उपस्थित होते. स्पर्धेत लाखोटीया भुतडा हायस्कूल कोंढाळी, इंदिरा गर्ल्स हायस्कूल कोंढाळी, त्रिमूर्ती विद्यालय दुधाळा, पीएमश्री शाळा क्रमांक १ कोंढाळी, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चंदनपाडी, जुनापाणी, खुसापार, मासोद हायस्कूल मासोद,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मासोद, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चिखली, लोणकरण राठी प्राथमिक शाळा कोंढाळी तसेच डॉल्फिन कॉन्व्हेंट, कोंढाळी या शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

परीक्षा केंद्र कोंढाळी, दुधाळा व मासोद येथे होते. कोंढाळी येथे केंद्र संचालक म्हणून प्रमोद बोडखे, दुधाळा येथे राजाराम खामकर, तर मासोद येथे दिलीप वैद्य यांनी जबाबदारी सांभाळली. माजी पंचायत समिती सभापती संजयजी डांगोरे यांनी परीक्षा केंद्राला भेट देऊन या स्तुत्य उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रविणा चिचमलकर, अभय मानेकर, स्पर्धा संयोजक दर्शना बोडखे, रुपेश राठोड, अर्चना राऊत, सुनंदा जामदार, पी.एम. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक १ कोंढाळीच्या मुख्याध्यापिका रजनी मानकर, चेतन महाले, आशिष वाघाडे, उमेश फरकाडे यांचे सहकार्य लाभले.

शब्दवेली
साहित्य विशेष
दैनिक
सिंहवाणी वृत्त
६ दिनांक : बुधवार, २८ ऑक्टोबर २०२६
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

स्त्री मनाची भावस्पंदने उलगडणारा काव्यसंग्रह 'गहिवरल्या क्षणांचा कोलाज...'

समीक्षण –> राजू गरमडे,ऊर्जानगर,जि.चंद्रपूर.
कवितासंग्रह –> गहिवरल्या क्षणांचा कोलाज
कवी –> दिनेश काशिराम बसेने
प्रकाशक –> अष्टगंध प्रकाशन,ठाणे.
प्रथमावृत्ती –> ११ जून २०२६
प्रस्तावना –> श्री.ऐश्वर्य पाटेकर
ब्लर्ब –> कल्पना दुधाळ
मुखपृष्ठ –> संतोष घोंगडे
पृष्ठ –> ७८
मूल्य –> २००/-फक्त

कवी दिनेश काशिराम बसेने यांचा 'गहिवरल्या क्षणांचा कोलाज' हा काव्यसंग्रह नुकताच वाचनात आला.कवी दिनेश बसेने यांची कविता जनसामान्यांचं प्रतिनिधीत्व करणारी आहे तशीच ती समाजात घडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांना कवितेमधून मांडणारी आहे.समाजात चाललेल्या नीतीचं, अनितीचं, मुल्यांचं, विचारांचं अभ्यासपुर्ण विवेचन करणारी आहे.
स्त्री ही सृष्टीचं सृजन करणारी आहे. तिच्या उदरातूनच या विश्वाची निर्मिती झालेली आहे. ती जगतजननी आहे. हे जरी सत्य असलं तरी समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन मात्र आजही तितकासा चांगला नाही. हे समाजात घडणाऱ्या घटना सांगत आहे.
समाजामधलं वास्तव अधोरेखित करणाऱ्या कविता आणि खालावत चाललेली मानवी मुल्ये कवी आपल्या कवितेमधून मांडत आहे.मानवी आयुष्याची वीण उलगडताना कवी मानसातल्या विकृतपणाचंही दर्शन घडवित आहे. काही कवितावर लिहिण्याचा मोह झाल्याशिवाय राहात नाही.
स्त्री
जाणिवांना,भावनांना,दुःखांना,वेदनांना,मनातल्या घुसमटीला अभिव्यक्त करणारी दिनेश सरांची कविता स्त्रीमनाच भावविश्व सुंदरपणे मांडीत आहे.
"बाईचा जीव " या कवितेमधून कवीनी स्त्रीचं जीवन कसं असतं हे सुंदरपणे मांडलेलं आहे.
"एखाद्या भांड्यात ठेवलेलं
गरम दूध
थंड करण्यासाठी
दुसऱ्या भांड्यातल्या
थंडगार पाण्यात
ठेवलं की,
दूध थंड करता करता
पाणी तापू लागतं...
...तसा बाईचा जीव"
बाईच्या जीवनात वेदनेची तीव्रता किती असते हे दर्शविणारी ही कविता
आहे.वेदनानंतरची
सुखाची झुळूक अनुभवत असतानाच तिला पुन्हा येणाऱ्या दुःखाना तिला सामारे जावे लागते आणि हे चक्र असचं चालू राहात असत.
मानवी आयुष्यावर लिहिलेली "आयुष्य" ही कविता जीवनातील कटू वास्तव दर्शविणारी आहे. जीवन सुंदर आहे



पण तितकच ते गुंतागुंतीच आहे. "पराधीन आहे जगती पूत्र मानवाचा" गदिमानी उगीचच लिहून ठेवलेले नाही.नियतीच्या गर्भात दडलेल आयुष्य छोट्या छोट्या सुखदुःखाच्या धाग्यानी विणलेल आहे.कधी सुखाचे धागे सूटतात तर कधी दुःखाचे.
"आयुष्य" ही कविताही जीवनाचे सुक्ष्मपणे विवेचन करणारी आहे.
"सजवलेलं
झगमगीत आयुष्य
जेव्हा पाहिलं
एकाएकी उसवताना
धाग्यागणिक
तेव्हा,
रफू मारायला जमेना
एवढं मात्र आता निश्चित -
आयुष्यालाही आयुष्य असतं
अगदी चिंध्यासारखं !"
आयुष्याचे विविधांगी कंगोरे उलगडणारी ही कविता जीवनाचे गहन भाव मांडणारी आहे.
आईवर कविता लिहिणार नाही असा कवी शोधूनही सापडणार नाही. आई म्हणजेच ईश्वर. ईश्वर म्हणजेच आई. वात्सल्य, त्याग, समर्पण आणि प्रेमाचा महासागर जिथे एकवटल्या जातो ती आई आहे. प्रसूतीच्या नरकयातना सोसून ती बाळाला जन्म देते. त्यामुळे आपल्याला सांभाळणारी, लहानाचा मोठ करणारी, भरणपोषण करणारी आई जेव्हा या जगात नसते तेव्हा आपण एकटे पडतो. सर्व काही असून नसल्यासारखे वाटते.
कवी आपल्या " लेक " या कवितेमधून आपल्या लेकीमध्येच आईला पाहतो आहे.
कवी लिहितो..,
"अजूनही निघतो ' आई गं ' आवाज
मनातल्या खोल खोल गतेतून
जखम झाल्यावर ' वा '
अचानक आलेल्या संकटात
आपसूकच
तेव्हा तू धावून यायचीस
एका हाकेवर
आलिंगन देऊन
पदरात घ्यायचीस
आता तू नाहीस...
लेक पाहात असते
अन् धावून येते
आता या आवाजावर
तिलाच समजतो माय"
दुःखात,वेदनेत धावून येणारी आई पण आई नसल्यावर धावून येणारी आपले लेक कवीला आईच वाटते. ही एक प्रकारे आईची मायाच आहे.
कवीने आपल्या " मास्तर " या कवितेमधून एका आईने लेकीच्या शिक्षकाकडे कळकळीची मागणी केलेली आहे. परिस्थितीने कष्टाचं काम करायला लागणाऱ्या आणि हाताला काम करुन करुन दुखणाऱ्या हातावर मारु नका अशी आर्त विनंती एका आईने केलेली आहे.
तिला मारायचेच असेल तर तिच्या तळहातावरच्या रेषेमध्ये दडलेल्या अज्ञानाला मारा. विचारांच्या अंधाराला मारा. तिच्या सतबुद्धीला सर मार्गाकडे नेण्यासाठी प्रयत्न करा. प्रकाशरुपी विद्येने तिला प्रज्वलित करा. तिच्या मनातला ज्ञानाचा दिवा पेटवा. याच ज्ञानाच्या विचारुपी दिव्यातून ती दोन्ही घर उजळवून टाकल्याशिवाय राहणार नाही.
कवी " लेक " या कवितेमधून लेकीच्या ऊज्वल भविष्याशी मागणं मागताना म्हणते,
"मास्तर !
मारायची असेल तर
तिच्या तळहातावरच्या रेषांत
दडलेल्या
त्या अंधारावर
उजेडाची छमछम छडी मारा
जेणेकरुन लेक कुठेही
उजेड घेऊन फिरेल"
कष्ट करणाऱ्या हातावर मारण्यापेक्षा तिच्या मनातला विद्येचा प्रकाश प्रज्वलित करा जेणेकरुन ती ज्ञानाचा प्रकाश सगळीकडे नेण्याचा प्रयत्न केल्यावाचून राहणार नाही.मुली दोन्ही घरानां उजळवून टाकते हे तुम्हाला माहित असेलच.
कवीने आपल्या " कातडी " या कवितेमधून आपल्या हळव्या मनाचे दर्शन घडविले आहे. पतीच्या पायात खुडलेला काटा जेव्हा पत्नी काढत असते तेव्हा लेक ती पाहात असते आणि निघालेला काटा जमिनीत गाडून टाकते दुसऱ्यांच्या पायात रुतू नये म्हणून. आपल्याला झालेली वेदना ती दुसऱ्याला होऊ नये ही जी भावना आहे ती या कवितेमधून व्यक्त झालेली आहे.
कवी लिहितो,
"...अन् पाठ करुन
उचकूनउचकून
रडत निघालेला काटा
ती मातीत गाडून टाकते
पुन्हा एखाद्याची कातडी
सोलू नये म्हणून"
ही कविता वाचल्यानंतर मला संत कवी नरसी मेहता यांच्या 'वैष्णव जन तो तेने कहिए जे पीर पडाई जाने रे' या रचनेची आठवण झाली.
कवीची "चॉकलेट" ही कविता आजच्या विकृत आणि लंपट वृत्तीच भीषण वास्तव मांडीत आहे. अबोध आणि निर्विकार मनाच्या मुली जेव्हा चॉकलेटच्या मोहात अडकात आणि बलात्काराच्या शिकार होतात तेव्हा त्यांच्या मनात निर्माण झालेली भीती आणि अस्वस्थता कायमच घेऊन त्या वावरत असतात.
कवी "चॉकलेट" या कवितेमधून समाजातील विकृत मानसिकतेचा बुरखा टराटरा फाडीत आहे.
"...मोठी होऊन
काय बनणार ?
हा प्रश्न शिक्षिकेने
तिला विचारल्यावर
शेजारची चिमुरडी आठवू लागते
कशाप्रकारे
एका चॉकलेटने
त्या कोवळ्या निरागसला
दिले होते अगणित ओरखडे
काही दात पडलेल्या तोंडाने
कडकडून घेतले होते
खूप सारे नको ते चावे..."
कवीने आपल्या " पूर्ण गुण " या कवितेमधून निराशेचे, असमर्थतेचे भाव अभिव्यक्त केलेले आहे. घराला घरपण आणण्यात नेहमीच पुढाकार घेणारी, सगळ्यांशी जुळवून घेणारी, समजून घेणारी, चांगल्या वाईटाचे अर्थ समजून सांगणारी ती जीवनाची प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी काटेकोरपणे नियोजन करणारी, तरी पण वाट्याला मात्र अपयश येताना पाहावं लागणारी.
स्त्री कितीही खंबीरपणाने उभी राहिली, रात्रदिवस एक करुन घराला एकसंध ठेवणारी ती मात्र दुर्लक्षितच राहते ही खंत व्यक्त करणारी ही कविता आहे.
"अशी कोणतीच जागा
रिकामी नाही अजून
जी तू भरलेली नाहीस
करत गेलीस पुन्हापुन्हा
अधोरेखित
आयुष्यभर जोड्या जुळवत
गेलीस
समानार्थी नि विरुद्धार्थी
साऱ्याच समांतर स्तंभांचे
फरक स्पष्ट करत गेलीस
जगावं की नाही याच्यात"
"तुटलेलं पान" या कवितेमधून कवीने वृक्षापासून अलग झालेल्या वाळलेल्या पानावर लिहिलेल आहे.ज्या झाडाने आपल्याला अंगाखांद्यावर खेळविल,आकाशातून येणाऱ्या सूर्यप्रकाशाने आपल्याला वाढविल,ज्या झाडानी आपल भरणपोषाण केल,ज्या मातीनी आपल्याला वाढविल त्याच मातीशी,आकाशाशी ते पान वाळल्यानंतर मातीच्या कुशीत अलगदपणे विसावते.एक कृतज्ञता म्हणून.
आपण कितीही मोठे झालो, यशस्वी झालो तरी माणसाने नेहमीच आपल्या मातीशी नाळ जुळवून ठेवली पाहिजे.कारण याच्यामुळेच हा दिवस आपल्या आयुष्यात आला ही जाणिव कुणीही विसरु नये असे कवी या कवितेमधून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.
कवी लिहितो,
"आता तुटल्यावरही तुटतच जातं
पुन्हापुन्हा
वाळलेलं पान
पान उडतच जातं पर्णहीन
झालेल्या
वृक्षांच्या चौकटीबाहेर
नातं जोडतं तुटलेलं, विखुरलेलं,
बाटलेलं पान
मातीशी अन् आभाळाशी
वारा आल्यावर"
या कवितेमधील इतरही कविता वाचकांना विचार करायला लावणाऱ्या आहेत.
स्त्रीच्या सहनशीलतेचं आणि संयतपणाचं दर्शन घडविणारी " ताम्रपट "....,
संघर्षाच,प्रतिकूल परिस्थितिच भावचित्र निर्माण करणारी " कोळसा "....,
मुलीच्या बालविश्वात दशहत, अस्वस्थता,भीती निर्माण करणारी " कपडे नसलेली अक्षरे "....,
प्रकाशाला भिऊन अंधारामध्येच राहणारी, कपड्यात राहणाऱ्या माणूस नावाच्या जंगली श्वापदापासून स्वतःला वाचविणारी "शेजारच्या पोरी "....,
पोटासाठी गाव सोडून शहरात जाणाऱ्या आणि गावाच्या मातीपासून,माणसापासून नात तोडणारी " किती बदलतो होतो मी " .....,
वासारख्या कविता वाचकांना विचारमंथन करायला लावणाऱ्या आहेत.
अष्टगंध प्रकाशन, ठाणे या प्रकाशन संस्थेने अतिशय देखण्या रुपात हा कवितासंग्रह वाचकांच्या हाती दिलेला आहे.
या कवितासंग्रहाला तितकीच अभ्यासपूर्ण आणि कवितेचे पदर लीलया उलगडणारी, सविस्तर अशी प्रस्तावना पहिला युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी ऐश्वर्य पाटेकर यांची लाभलेली असून सुंदर असं ब्लर्ब कल्पना दुधाळ यांनी दिलेलं आहे.
पुनश्च मी कवी, लेखक दिनेश बसेने सरांचे मनपुर्वक अभिनंदन करतो आणि त्यांना शुभेच्छा देतो.

मोदींचा बाप आठवला! स्वतःची आई का नाही?

झाडाझडती



विनोद देशमुख
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

आपले राजकीय नेते कृतिवीर कमी अन् वाचाळवीर जास्त होत चालले असल्याचं सध्या प्रकर्षानं जाणवत आहे. यात हा पक्ष की तो पक्ष, हा प्रश्न नाही. सर्वच पक्षांमधील नेत्यांची जीभ घसरण्यासाठी सारखी वळवळत असते, असाच अनुभव लोकांना वारंवार येत आहे. विरोधकांवर टीका करताना किमान भाषा तरी जपली पाहिजे, याचं भान नेत्यांनी ठेवणं अपेक्षित आहे. त्यातही, जास्त पावसाळे पाहणाऱ्या ज्येष्ठ नेत्यांवरची जबाबदारी मोठी आहे. पण जेव्हा ज्येष्ठ मंडळीच वाटेल तसं बोलून जातात, तेव्हा नव्या पिढीला काय म्हणणार? युवा नेत्यांनी कोणाचा आदर्श घ्यायचा? अन् मग हा वाह्यातपणा खालपर्यंत झिरपत जाऊन वातावरण नासत जातं. नव्हे, आज ते पूर्णतः नासलेलंच आहे.
याचं ताजं उदाहरण पाहा. सध्याच्या राष्ट्रीय राजकारणातील सर्वात ज्येष्ठ नेते (वय वर्षे ८४), अर्धशतकापेक्षा जास्त काळ आमदार- खासदार-मंत्री राहिलेले, सध्याचे राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. मापन्ना मल्लिकार्जुन खडगे परवा असंच काहीतरी बोलून गेले. पाटण्याच्या सभेत त्यांनी पंतप्रधानांचा बापच काढला! त्यांचं भाषण सुरू असताना प्रेक्षकांमधून कोणीतरी "मोदी सहजासहजी हटणार नाही" अशा अर्थाचं वाक्य उच्चारलं. ते ऐकून खडगे बावाजीचा तोलच ढळला! अन् ते ओरडले- "मोदी क्या, मोदीका बाप भी जाएगा। मोदीका बाप..."
आपल्याच सभेतील कार्यकर्ता एकप्रकारे मोदींची बाजू घेत असल्याचं पाहून संताप आल्याने ते असं बोलले असावेत. (नंतर या माणसाला लोकांनी झोडपून सभेबाहेर हाकलले !) वयोमानपरत्वे खडगेंची जीभ घसरली असावी, असंही कुणाला वाटू शकतं. परंतु, त्यांचा इतिहास पाहता, हा अंदाज चुकतो. मोदी, भाजपा, संघ यांच्याबद्दल खडगेंच्या मनात ठासून द्वेष भरलेला आहे, हे अनेकदा दिसून आलं आहे. विशेषतः २०२२ मध्ये कॅन्सरसाध्यरुग्ण झाल्यापासून तर ते नुसते बोलत सुटलेले दिसतात. त्याची ही काही तारीखवार उदाहरणं-
२९ नोव्हेंबर २०२२ : अहमदाबाद येथील सभेत मोदींना 'रावण' म्हटलं
२७ एप्रिल २०२३ : कर्नाटकाच्या कलबुर्गीत मोदींचा उल्लेख 'विषारी साप'
२१ एप्रिल २०२६ : चेन्नईत "मोदी आतंकवादी है"
इतके शिव्याशाप देऊनही मोदींचा एकही 'बाल बांका' होत नाही, असं पाहून खडगे आता त्यांच्या वडिलांवर आले की काय, माहीत नाही. पण, या विधानाचा समाचार घेणाऱ्यांनी ते त्यांच्यावरच उलटवण्याचा प्रयत्न समूह माध्यमांवर केलेला जाणवतो.
एक जण म्हणाला- "खडगेंना शेवटी मोदीजींचा बाप आठवलाच !" दुसऱ्यानं विचारलं- "त्यांना स्वतःची आई का आठवत नाही?" मयंक नाथ नावाचे मीडिया इन्फ्लुएन्सर लिहितात-
"जो धरती पर आया है, उसका जाना भी निश्चित है। मोदी का बाप भी गया था और खडगे की मां भी। फर्क सिर्फ इतना है कि मोदी का बाप अपनी पूरी जिंदगी जीकर ७४ वर्ष की उम्र में गया था। जबकि खडगे की मां को २६ वर्ष की उम्र में रझाकार मुसलमानों ने जिंदा जला दिया था। खडगे का बाप अपनी पत्नी की निर्मम हत्या का बदला लेने के बजाय गांव छोडकर भाग गया था। कुछ समय बाद उसने दूसरी शादी कर ली और खडगे को नई मां लाकर दी !"
काय राहिली खडगेंची? तुम्ही मोदींचा बाप काढला, तर कोणीतरी तुमच्या बापासोबत आईही काढली. निझाम स्टेट मधील रझाकारांच्या अत्याचारात आई आणि बहीण गमवावी लागण्याचा दुःखद प्रसंग खडगेंवर बालपणीच ओढवला, तेव्हा ते अवघे ६-७ वर्षांचे होते. त्या दोघींना रझाकारांनी जिवंत जाळले. हे मरण हैदराबाद मुक्ती संग्राम या स्वातंत्र्य लढ्यातील होतं. पण, त्याचा अभिमानानं उल्लेख करणं खडगेंच्या राजकारणासाठी सोयीचं नाही, उलट अडचणीचंच आहे! हे हेरूनच वरील पलटवार करण्यात आला, हे उघड आहे. यात खडगेंचीच फजिती होत आहे ना. क्षुद्र राजकारणासाठी वाटेल तसं बोलून-वागून काही लोक स्वतःची ऐसीतैसी का करून घेतात, हेच समजत नाही. खडगेंसारख्या ज्येष्ठतम नेत्यानं आणि सर्वच पक्षांमधील नेत्यांनी अशा टपटांग गोष्टी टाळल्या पाहिजे, अशी अपेक्षा बाळगणं चुकीचं आहे काय?

विकासाचं वाळवंट!

भीमाशंकरच्या रानात आज, कुऱ्हाडीचे घाव होत आहे,
हिरव्यागार झाडांच्या जखमांतून, रक्तासम अश्रू वाहत आहे
ज्या झाडाने आयुष्यभर,माणसाला श्वास आणि सावली दिली,
त्याच झाडाच्या जखमांनी,जणू माणुसकीलाच हाक दिली....

ज्या फांद्यांवर पक्ष्यांनी, स्वप्नांची घरटी सजवली होती,
त्याच फांद्यांच्या तुटण्याने, कित्येक पाखरं पोरकी झाली..
आईची माया, घरट्यांचा आधार, क्षणात सारं उद्धवस्त झालं,
झाडांच्या या कत्तलीने, कित्येक जीवांचं जगणंच हरवून गेल..

अरे माणसा, त्या झाडालाही जगण्याचा अधिकार होता,
ऊन-पावसाशी झुंजत उभं राहणं, हाच त्याचा संसार होता,
विकासाच्या नावाखाली, स्वतःचा श्वास कशाला हिरावतोस?
ज्या निसर्गाने जीवन दिलं, त्याचाच जीव कशाला घेतोस?

टरॅंटर पॉवर कंपनीही होईल, संपत्तीचे डोंगरही वाढतील,
पण निसर्गाची नाळ तुटली तर,जगण्याची मुळंच कोमेजतील..
उद्या नद्या आटतील, हवा विषारी होईल, तेव्हा पैसा कामी येणार नाही,
जंगलाचा वाळवंट असाच होईल तर, हिरवळ कुठेच दिसणार नाही.

म्हणून जर,
झाडाला बोलता आले असते तर, न्यायासाठी धाव घेतली असती,
आपल्या तुटलेल्या फांद्यांतून,माणुसकीचे दुःख मांडले असते,
माझ्या कुशीत विसावणाऱ्या पाखरांचा आक्रोश ऐकला असतास,
तेव्हा विकासाच्या नावाखाली अंत करताना,
तुझा हात नक्कीच थरथरला असता!!

– विशाल एम. शेंडे, चंद्रपूर
मो. ९३०९८२४३९६



युग पुरुष

देवकीचा पुत्र आठवा
वाढला नंद- यशोदे घरी
खोडकर भारी नंदलाला
दह्या दुधाच्या चोऱ्या करी

सदा बासरी अधरी
गोड वाजवी बासरी
सूर ऐकता तियेचे
राधा होतसे बावरी

वेड लावी सूर जीवांना
राधे संग खेळ खेळी कान्हा
पक्षी पण होती मंत्र मुग्ध
गाईंना फुटे प्रेमे पान्हा

द्रौपदीचा असे तो सखा
धावा करी ती संकटाला
त्वरित येई धावत हरि
सदा तत्पर तिच्या रक्षणाला

दिधले बोधामृत गीतेतूनी
जीवन सार दिले जगताला
अर्जुनाचा सारथी राहूनी
रणांगणी दूर केले अज्ञानाला

मूर्तीमंत प्रेम राधे कृष्णाचे
खऱ्या भक्तीचे ते प्रतिक
अव्दैताचा आत्मा एकरुप
असे प्रेम तयांचे सात्त्विक

– वैशाली वर्तक
अहमदाबाद
मो. ८१४१४२७४३०